
# आहे ठाणे माझे सुंदर, तरीही....!



पुनम सिंगवी

# सुंदर ठाण्यातील पावसाळी निसर्ग















# आहे
# ठाणे माझे सुंदर,
# तरीही...!

(विनामूल्य 'ई' संदर्भ पुस्तक)

लेखक
पुनम सिंगवी

'आहे ठाणे माझे सुंदर, तरीही... ' हे पुस्तक श्री पुनम सिंगवी यांनी लिहिले व स्वतः प्रकाशित केले आहे. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखक श्री पुनम सिंगवी यांचेकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री पुनम सिंगवी :-9323291890

तसेच हरियाली व अंकुर प्रकाशन

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# आहे ठाणे माझे सुंदर, तरीही...

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओोळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. तेही पुस्तकांद्वारेच. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!
वाचायला तर हवंच!
पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...
...आणि स्वतःही लिहायला हवं.

# अनुक्रमणिका


१ कृत्रिम श्वासनलिकांनी तलाव वाचतील का? ................................. ७

२ बिल्वदली, कमलपुष्पी ठाणे नगरी! ........................................... ११

३ समृद्ध परंपरांचं जतन ................................................................ १४

४ प्राचीन वृक्ष ............................................................................... १६

५ ठाणे खाडीलगत होत असलेला बहुचर्चित भराव .......................... २०

६ गच्चीवरील बागेतील हिरवा आनंद ............................................. २३

७ फळांनी लगडलेला गच्चीतला करमळ .......................................... २६

८ मुंडा डोंगर – एक आव्हान ........................................................ २७

९ निसर्गपूजा : एक आमंत्रण आणि आवाहन ................................... ३३

१० पटली ओळख छायाचित्रांतील ठिकाणांची? ............................... ३६

११ ठाणे जिल्ह्याचे पर्यावरण अजूनही सावरता येईल! ...................... ३८

१२ वणव्यांची तमा न बाळगता वृक्ष लावणारे हजारो हात हवे आहेत! ४५

१३ स्वच्छ शहरे– जबाबदारी कोणाची? ........................................ ५१

१४ ... तर या देशात अनेक चंद्रशेखर निर्माण होतील ...................... ५५

# पुनम सिंगवी यांनी लिहिलेली अन्य पुस्तके

ग्यानबाची भटकंती

ग्यानबाचे पर्यावरण

आमची जागतिक मुसाफिरी (सहलेखक प्राचार्य अच्युत ओक)

असे लिहिले होते लो. टिळकांनी १०० वर्षांपूर्वी (इंटरनेट आवृत्ती)

माझे अध्यात्म : महाराष्ट्र टाइम्समधील लेखमालिका (इंटरनेट आवृत्ती)

केंद्रीय अर्थसंकल्पावरील लेखमालिका (इंटरनेट आवृत्ती)


कायद्याच्या माध्यमातून पर्यावरणरक्षण :
सन्मित्रमधील लेखमालिका (इंटरनेट आवृत्ती)

झेप (काव्यसंग्रह – सहभाग)

हम (हिंदी काव्यसंग्रह – सहभाग)

Ready Referencer to Incometax Act and Cases
(English - jointly with Adv. M. K. Gore)

# लेखकाचे मनोगत




उल्हास खाडीच्या पार्श्वभूमीवर मुंडा डोंगरावर लेखक श्री.पुनम सिंगवी

आम्ही १९९५ च्या अखेरीस मुलुंडहून ठाण्यास राहायला आलो. मी त्या वेळी त्रेपन्न वर्षांचा होतो.

व्यवसायाने चार्टर्ड अकाउन्टन्ट असलो तरी रानावनातून आणि इतरत्र भटकंती करत त्यावर लिहीत राहण्याची विलक्षण आवड होती. आता वयाची बाहत्तर वर्षे पूर्ण होत आली तरी ती तशीच टिकून आहे.

ठाण्याला राहायला आल्यानंतर लवकरच म्हणजे १९९६ साली समविचारी लोकांना बरोबर घेत आम्ही 'हरियाली' या सेवाभावी संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून पर्यावरणरक्षणाच्या क्षेत्रात रचनात्मक कार्य करत राहण्याचा धडाका आम्ही सुरुवातीपासूनच लावला. या सर्व कार्यात समाजाच्या विविध घटकांतील लोकांकडून, विशेषतः विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, गृहिणी, उद्योगजगत आदी घटकांकडून प्रचंड प्रतिसाद आणि उत्स्फूर्त योगदान मिळत गेले. थोडक्याच अवधीत हरियालीचे नाव घरोघरी पोहोचले. त्यासाठी मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी ठाणे परिसरात भरपूर भटकंती केली. त्यावर विपुल लिखाण केले, व्याख्याने दिली, स्थानिक वृत्तवाहिन्यांवर नवनवीन कार्यक्रम सादर केले. त्यामुळे ठाणे शहरात आणि

परिसरात मला ‘चार्टर्ड अकाउन्टन्ट’ पेक्षा ‘हरियाली’चा जनक म्हणूनच लोक अधिक ओळखायला लागले! या सर्व कार्यासाठी ठाणे महानगरपालिकेने आणि इतर अनेक संस्थांनी मला आणि हरियालीला ‘ठाणेगौरव’, ‘ठाणेनगररत्न’, ‘व्यासरत्न’ ‘स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार’ आदी विविध पुरस्कारांनी सन्मानित केले.

माझ्या वृत्तपत्रीय लिखाणातून मी ठाणे परिसरातील विविध सौंदर्यस्थळांबरोबरच शहरात आढळून येणाऱ्या वैगुण्यांवरदेखील भाष्य केले. त्यातील निसर्गविषयक व पर्यावरणविषयक काही निवडक लेखांचा समावेश ‘ग्यानबाची भटकंती’ आणि ‘ग्यानबाचे पर्यावरण’ या इ.स. २०१३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांमध्ये करण्यात आलेला आहे. उर्वरित काही लेखदेखील ठाणे शहराच्या भविष्यातील ऐतिहासिक संदर्भासाठी एकत्रितरीत्या प्रसिद्ध व्हावेत असे मला वाटले. त्यासाठी मी ‘इ-बुक’च्या आधुनिक माध्यमाचा आधार घेण्याचे ठरविले. त्याचेच फलित म्हणजे प्रस्तुतचे संकलन ‘आहे माझे ठाणे सुंदर, तरीही...!’ हे होय.

भविष्यात या संकलनाचा उपयोग एक संदर्भनामा म्हणून अधिक होईल अशी माझी धारणा आहे. तसे झाले तर ठाणे शहरातील माझ्या वास्तव्यातील कार्यात ठाण्यातील नागरिकांकडून मला जे प्रेम आणि योगदान मिळाले त्याचे ऋण अंशतः तरी फेडण्यात यशस्वी झाल्याचा आनंद मला होईल.

या संकलनाच्या शेवटी फोटोंचा एक संदर्भसंग्रह ठेवला आहे. तो वेळोवेळी अद्ययावत ठेवण्याची संकल्पना आहे.

सदर पुस्तक सर्वांसाठी विनामूल्य उपलब्ध असणार आहे.

माझ्या या उपक्रमात ठाण्याचे अंकुर प्रकाशन आणि कलाकार श्री.विकास फडके यांचे मला मोलाचे सहकार्य मिळाले आणि ज्या वृत्तपत्रांतून आणि नियतकालिकांमधून हे सर्व लेख वेळोवेळी प्रसिद्ध झाले त्यांचे आणि हरियालीतील माझे सर्व सहकारी आणि योगदाते आदी सर्वांचे आभार मानणे मी माझे कर्तव्यच समजतो.

पुनम सिंगवी

ठाणे, ३० मे २०१४

# लेखक श्री. पुनम सिंगवी यांचा संक्षिप्त परिचय

'पुनम सिंगवी' (पुनमचंद उत्तमचंद सिंगवी) हे शिक्षण आणि व्यवसायाने चार्टर्ड अकाउन्टन्ट. सुमारे बारा वर्षे मुंबई येथील पोदार आणि मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये अध्यापन. लघुउद्योग प्रकल्पांच्या निर्मितीत प्रमुख सहभाग. 'स्पन पाईप' या स्पन पाइप्स् मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मासिकाचे संस्थापक-संपादक. मुलुंड जिमखाना आणि हरियाली आदी सेवाभावी संस्थांचे जनक.

मध्यमवर्गीय सुशिक्षित, सुसंस्कृत शेतकरी-उद्योजक कुटुंबात जन्म. प्राथमिक शिक्षण धुळे जिल्ह्यातील फागणे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत, तर माध्यमिक शिक्षण धुळे व महाविद्यालयीन शिक्षण मुंबईसारख्या ठिकाणी. त्यामुळे व्यक्तिमत्त्व सव्यसाची होण्यास मदत.

शालेय जीवनापासूनच भटकंती आणि रचनात्मक सामाजिक कार्याची आवड. भटकंतीच्या आवडीतून पर्यावरणरक्षणाच्या रचनात्मक कार्यात जोडले गेले. ठाणे परिसरात पर्यावरणविषयक जनजागृती निर्माण करण्यात सिंहाचा वाटा.

हरियालीच्या माध्यमातून लक्षावधी वृक्षांची लागवड करण्यात प्रमुख सहभाग. पर्यावरणरक्षण, भटकंती आदी विषयांवर विपुल वृत्तपत्रीय लिखाण. ठाणे गौरव, ठाणे नगररत्न, व्यासरत्न, वसुधा महाबळ पुरस्कार आदी विविध पुरस्कारांचे व सन्मानांचे मानकरी. महाराष्ट्र राज्याच्या वनविभागातर्फे मानद वन्यजीव रक्षक म्हणून सन्मानित. वनविभाग आणि ठाणे महानगरपालिका यांच्या विविध समित्यांवर सेवाभावी सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत.

सध्या वास्तव्य ठाणे येथे.

५/७०२, फ्लॉवर व्हॅली, पूर्व द्रुतगती मार्ग,
ठाणे ४००६०१
punamsingavi@gmail.com

# १. कृत्रिम श्वासनलिकांनी तलाव वाचतील का?



ठाणे महानगरपालिकेसमोरचा सुंदर कचराळी तलाव

ठाणे शहरातील महानगरपालिकेच्या १९९८च्या अहवालात उल्लेख असलेल्या ३० तलावांपैकी १० तलावांचे शुद्धीकरण आणि सुशोभीकरण यांसाठी केंद्राने एक कोटी ८६ लाख रुपयांचे अर्थसाह्य देऊ केले आहे. या १० तलावांमध्ये उपवन, रबाले, जेल, मखमली, सिद्धेश्वर, कोलबाड, ब्रह्माळा, खारीगाव, हरियाली (ठाणे पूर्व) आणि कोलशेत या १० तलावांचा समावेश आहे. याविषयी महानगरपालिकेकडून वेळोवेळी प्रसृत करण्यात आलेल्या माहितीचा थोडक्यात गोषवारा असा:

'सदर तलावांचे पाणी शुद्ध करण्यासाठी जैविक तंत्रज्ञानाचा आधार घेण्यात येणार आहे. या पद्धतीत पाण्यात जागोजागी प्राणवायू सोडला जाऊन पाण्यातील जैविक घटकांची वाढ होईल असे प्रयत्न केले जातात. त्यामुळे पाणी शुद्ध होण्यास मदत होते. त्यासाठी निवड करण्यात आलेल्या

दहा तलावांपैकी चार तलावांत अशी प्रक्रिया करण्यासाठी केळकर-वझे महाविद्यालयातील आणि चांदीबाई महाविद्यालयातील जैविक विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थी ह्यांचा उपयोग करून घेण्यात येणार आहे. इतर तलावांबाबत मात्र हेच काम काही बहुराष्ट्रीय कंपन्या अथवा त्यांच्या भारतीय प्रतिनिधींना कंत्राट देऊन करण्यात येणार आहे. त्यासाठीचा खर्च महानगरपालिका आपल्याला केंद्राकडून मिळणाऱ्या अर्थसाह्यातून करणार आहे.'

तलावांच्या संदर्भात महानगरपालिका करत असलेल्या या प्रयत्नांचे कौतुक करत असताना पुढील प्रश्नांची उत्तरेदेखील महानगरपालिका प्रशासनाकडून मिळणे आवश्यक आहे, असे वाटते.

**१) तलाव परिसरातील अस्वच्छता :** तलावाचे पाणी आणि परिसर अस्वच्छ होण्याची कारणे प्रत्येक तलावागणिक वेगवेगळी आहेत. त्यात तलावामध्ये मलमूत्र विसर्जनापासून, कपडे आणि वाहने धुणे, रासायनिक द्रव्ये सोडणे, प्लॅस्टिकच्या पिशव्यांमधून आणि एरवीदेखील निर्माल्य टाकत राहणे, प्लास्टर ऑफ पॅरिस आणि विषारी रंगमिश्रित मूर्तींचे विसर्जन आदी सगळ्याच गोष्टींचा अंतर्भाव होतो. या सगळ्याच गोष्टींमुळे पाणी कमी-अधिक प्रमाणात अस्वच्छ आणि प्रदूषित होत राहते. प्रत्येक तलावामध्ये प्रचंड प्रमाणात पुन्हा-पुन्हा येत राहणारे शेवाळ आणि पाणवनस्पती आहेत. अशा सगळ्या घटकांचा विचार करून मग त्यावर आवश्यक असे तंत्रज्ञान वापरणे गरजेचे आहे. या सर्वच घटकांमुळे होत राहणारी घाण आणि प्रदूषण यांवर जैविक तंत्रज्ञानाचा वापर हा एकच उतारा आहे का? जाणकरांकडून यावर मिळणारे उत्तर नकारार्थी आहे.

**२) हमी काळानंतर तलाव स्वच्छ राहतील याची शक्यता किती?**

जैविक तंत्रज्ञान आणि प्राणवायू मिश्रणाची प्रक्रिया वापरून तलावातील पाणी स्वच्छ ठेवणे म्हणजे एखाद्या हृदयरोग्याला नळ्या लावून कृत्रिम श्वासोच्छ्‌वासावर जिवंत ठेवण्यासारखे आहे. इतर मूलभूत, ठोस उपाय करण्यात आले नाहीत आणि हवेच्या या नळ्या काढण्यात आल्या, तर परिस्थिती पूर्ववतच होणार आहे. त्यासाठी मुळात तलावांचे पाणी अस्वच्छ आणि प्रदूषित करणारे घटक आणि कारणे ह्यांचा बंदोबस्त होणे आवश्यक आहे. तसे न करता या तंत्रज्ञानाचा उपयोग हमी

कालावधीपुरताच केला, तर मात्र आज होणारा सर्व खर्च हा अक्षरशः पाण्यातच जाईल.

**३) तंत्रज्ञानाची परिमाणे अजून निश्चित नाहीत :** ज्या तलावांचे पाणी शुद्ध करण्यासाठी जैविक तंत्रज्ञान वापरायचे ती परिमाणे ठरविण्यासाठी आता अशा तलावातील पाण्याचे नमुने गोळा करण्यास सुरुवात झाली आहे, असे कळते. खरे म्हणजे कुठले आणि कोणाचे तंत्रज्ञान आणि का वापरावयाचे, हे ठरविण्याआधीच या गोष्टींचा विचार व्हायला हवा होता, नाही का?

**४) तलावातील गाळाचा उपसा :** तलावातील गाळाचा उसपा करण्यावरदेखील फार मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च होणार असल्याचे कळते. खरे म्हणजे असा गाळ काढणे आवश्यक आहे. तसेच तो पुन्हा-पुन्हा होत राहणार नाही, हे बघणेदेखील आवश्यक आहे. असा उसपा तलावातील पाण्याची पातळी कमी झालेली असताना मार्च-एप्रिल-मे या महिन्यांमध्ये करणे आवश्यक आणि सयुक्तिक असते. मात्र रायलादेवी तलाव परिसरात असा उसपा करण्याचे नाटक सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यातच करण्यात आले! त्या उसप्यामध्ये गाळ किती निघाला ते ठाऊक नाही मात्र त्या तलावात असलेल्या दुर्लभ जातीच्या कमळफुलांना आणि बिल्वदलांना उखडून टाकण्यात आहे.

**५) इतर तलावांचे काय? :** हे सर्व मोजक्या १० तलावांच्या संदर्भात झाले. त्यातील हरियाली, ब्रह्माळा आदी तलावांची अवस्था आणि आकार वेगवेगळ्या कारणांमुळे डबक्यासारखे झालेले आहेत. तरी त्यांच्या शुद्धीकरणावर आणि सुशोभीकरणावर लाखो रुपये खर्च होणार आहेत. कारण ते पैसे केंद्राकडून मिळणार आहेत. केंद्रालादेखील कदाचित ते जागतिक बँकेकडून मिळणार असावेत. बहुधा त्यातील बराच भाग ३१ मार्च रोजी संपणाऱ्या चालू वर्षाच्या अखेरीपूर्वीच खर्च करायचा असेल, कारण आता तो सर्व स्तरांवरील आपल्या प्रशासनाचा एक शिरस्ताच झालेला आहे.

पण उर्वरित २० तलावांचे काय? पालिकेने त्यासंबंधीची आपली भूमिकादेखील आजच स्पष्ट करणे आवश्यक आहे. कारण या तलावांचे रक्षण, स्वच्छता आणि सुशोभीकरण यांसाठी केंद्राने अजून काहीही

अर्थसाह्य मंजूर केलेले नाही. मग ठाणे पालिका त्याबाबतीत काही करणार आहे की नाही?

पुनम सिंगवी

सकाळ, मुंबई २७ मार्च २००४

* * *



**ठाणे शहाराचा मानबिंदू असलेला मासुंदा तलाव**

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पार्श्वभूमीवरील नयनरम्य उपवन तलाव**



# २. बिल्वदली, कमलपुष्पी ठाणे नगरी!




बारा बंगले परिसरातील सुरेख पुष्करिणी

सोबतच्या छायाचित्रातील विविधरंगी कमलपुष्पे बघून मोहित झालात ना? आहेतच तशी ती सुंदर, इवलीशी पुष्करिणी आणि त्यांतील बिल्वफुले!

आणि खरे म्हणजे त्याचे नेत्रसुख घेण्यासाठी आपल्याला फार लांब जावे लागत नाही! ते एक इवलेसे जलकुंड आहे ठाणे पूर्व येथील कोपरी विभागातील बारा बंगले परिसरातील 'जॉगिंग ट्रॅक'च्या बाजूला असलेल्या पदपथावरील हिरवळीवर! एवढ्या खाणाखुणा दिल्यानंतर आपण एखाद्या रम्य प्रत्यक्षात सकाळी थोडेसे लवकर उठून त्या भागात फिरायला जाऊन त्याचा शोध घ्यायलाच हवा! थोडे फिरलात तर ते आपल्याला बरोबर तिकडे आकर्षून घेईल! फिरायला येणाऱ्या इतर कोणाला त्याचा ठावठिकाणा विचारीत त्यांच्या तंद्रीचा भंग करू नका. कारण त्यांतील कोणी योगाचे वेगवेगळे प्रकार करीत असतात तर कोणी कपालभाती! कोणी रामरक्षा म्हणत

असतो तर कोणी इतर प्रार्थना. कोणी घामाघूम होत धावत असतो तर कोणी हातातील काठीचा आधार घेत आपल्या वयाचे भान ठेवत चालत असतो. फिरून झाल्यावर कट्ट्यावर बसून दिवसभराच्या भेटीगाठी ठरविणे, मुलाबाळांची गाऱ्हाणी सांगणे, समवयस्कांबरोबर मन मोकळे करणे; असे प्रकारही चालत असतात.




**बारा बंगले परिसरात वेगवेगळ्या वृक्षांच्या बिया गोळा करताना हरियालीचे कार्यकर्ते – सर्वश्री गोविंदराव चव्हाण, मधुकरराव दाते, अजित देशबंधू, नितीन खरे आदी.**

मध्येच एखाद्या झाडाखाली पडलेल्या शेंगा, बिया आदींना सोने समजून गोळा करत राहण्याचा उपक्रम राबविणारे हरियालीचे कार्यकर्तेही दिसतात. एका हातात सतत कानाशी धरलेला मोबाइल आणि दुसरा हात जोरजोराने हलवीत रक्ताभिसरणाची प्रक्रिया चालू ठेवणारे महाभागही कमी नसतात. समोरून येणाऱ्या ओळखीच्या चेहऱ्यांशी स्मितहास्य अथवा हातवारे करूनच बोलणे करायचे असते.

रस्त्यावर जागोजागी स्पीड ब्रेकर्स आणि रस्त्याच्या टोकाला वाहने पुढे नेण्यासाठी अडसर उभारलेले आहेत. त्यामुळे 'धूम मचाओ' छाप वाहनांखाली येण्याची भीती नसते. फूटपाथवर टपऱ्या अथवा अतिक्रमणे

नाहीत. त्यामुळे पदपथ सोडून आपल्याला कधी रस्त्यावरून चालावेच लागत नाही. आणि हो, आपल्याला एक सांगायचे म्हणजे ठाणे शहराचे आणि जिल्ह्याचे प्रशासन सांभाळणाऱ्या बहुतेक सर्व उच्च पदस्थांची निवास स्थाने आणि काहींची कार्यालये याच परिसरात आहेत. त्यामुळे सगळा परिसर कसा अगदी चकाचक असतो. इथे सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्रोत्सव इत्यादींसाठी कधी रस्ते खणले जात नाहीत. उजाडायच्या आधीच अल्प तसेच बहुसंख्याकांच्या प्रार्थना स्थळातील ध्वनिवर्धक अथवा कोणाला कर्णकर्कश तर कोणाला मधुर वाटणारा घंटानाद कधीही कानी पडत नाही. किमान एकदा तरी फिरायला जाऊन थोडा वेगळा अनुभव घ्याच.

वाचकहो, आत्ताचे विस्तारित ठाणे महानगर कोणे एके काळी तलावांचे सुंदर शहर म्हणून ओळखले जायचे. ठाण्यात अशी शंभराहून अधिक तळी होती म्हणे. त्यांतील बऱ्याच तलावांत अशी सुंदर बिल्वदले असलेली मी स्वतः ठाण्यामधील गेल्या पंधरा वर्षांतील वास्तव्यात बघितली आहेत.

जागेच्या वाढत्या गरजेमुळे त्यांतील अनेक तळी आज अवैधरीत्या नष्ट झाली आहेत. फारच थोडी संकुचित स्वरूपात, बदलत्या रूपात आपले अस्तित्व टिकवून आहेत. काहींची कलेवरे दिसतात. काहींना शेवटची घरघर लागलेली जाणवते.

अशा वेळी किमान त्या प्रत्येक तलावाचे स्मारक म्हणून का होईना, परंतु प्रत्येक विभागातून (प्रभागागणिक) अशा एखाद्या छोटेखानी जलकुंडाची निर्मिती करून त्याचे रक्षण आणि देखभाल करत राहायला काय हरकत आहे? पर्यावरणप्रेमी महानगरपालिका आयुक्त, कर्तव्यदक्ष प्रशासन, जनसेवा तत्पर लोकप्रतिनिधी, दक्ष नागरिक, पर्यावरणप्रेमी संस्था, इतर विविध सेवाभावी संस्था, आदींनी खचाखच भरलेल्या ठाणे नगरीला बदलत्या युगातदेखील आपली वेगळी छबी निर्माण करणे अवघड आहे का?

* * *

# ३. समृद्ध परंपरांचं जतन



ठाण्यातील नववर्ष (गुढीपाडवा) स्वागतयात्रेत
हरियालीच्या कार्यकर्त्यांसमवेत लेखक पुनम सिंगवी

अनेक समाजसुधारकांच्या, थोर नेत्यांच्या आणि मान्यवरांच्या या महाराष्ट्रात माझा जन्म झाला हे माझं भाग्य आहे. माझा जन्म ग्रामीण भागात झाला. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात माझं शिक्षण झालं. त्यामुळे मला ग्रामीण तसंच शहरी भागातली सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती जवळून पाहता आली. त्याचा अभ्यास केला. त्यानिमित्तानं महाराष्ट्रातल्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांतल्या मान्यवरांचा सहवास मला मिळाला. त्यातूनच मी प्रगल्भ होत गेलो. माझा विकास झाला. आज मी जो काही आहे, तो यामुळेच. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक संस्था कार्यरत आहेत. त्याचा मी एक घटक असल्याचा मला अभिमान वाटतो. भविष्यात महाराष्ट्राचं हे वैभव टिकवून त्यात भर घालणं ही आपली जबाबदारी आहे.

पर्यावरणविषयक विविध चळवळींच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या जिल्ह्यांमध्ये फिरता आलं. इथल्या निसर्गात भ्रमंती करण्याचा आनंद घेता आला आणि ठेवा जपला पाहिजे या भावनेतूनच सामाजिक कार्याची प्रेरणा मिळाली. हे काम करताना वाटलं की, महाराष्ट्राला समृद्ध आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची देणगी मिळाली असूनही तिचं म्हणावं तसं जतन झालं नाही. त्याकडे नेहमीच दुर्लक्ष केलं गेलं. आज महाराष्ट्रात फिरताना ही संपत्ती नष्ट होत चालल्याची खंत वाटते. तसंच महाराष्ट्रात पर्यटनाचा फारसा विकास झाला नाही, त्यासाठी खास प्रयत्न व्हायला हवेत.




**२०१० सालच्या नववर्ष स्वागतयात्रेत हरियालीचा रथ आणि कार्यकर्त्यांसोबत लेखक**

परप्रांतियांविरुद्ध द्वेषभावना न वाढविता महाराष्ट्राची समृद्ध परंपरा जतन करण्याचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवला पाहिजे. त्यांना त्याची ओळख करून दिली पाहिजे. असं केल्यास त्यांच्या मनात महाराष्ट्राविषयी आपोआपच सकारात्मक भावना निर्माण होतील आणि महाराष्ट्राचा विकास होईल.

मुंबई टाइम्स १ मे २००९

* * *

# ४. प्राचीन वृक्ष



**कोलशेत परिसरातील ठाण्यातील सर्वांत सुंदर आणि प्राचीन वटवृक्षाच्या पार्श्वभूमीवर लेखक आणि श्री. काका केळकर**

भारतातील सर्वांत पुरातन आणि मोठं वडाचं झाड कुठं आहे, असा प्रश्न विचारला, तर कोलकात्याच्या 'बोटॅनिकल गार्डन'मध्ये असं योग्य उत्तर देणारे ठाण्यात किमान पाच हजार जण तरी आपल्याला भेटतील. पण ठाणे शहर अथवा परिसरातली सर्वांत मोठा वटवृक्ष कुठे आहे, असं विचारलं तर किमान दहा जणांना तरी बरोबर उत्तर सांगता येईल की नाही यात शंका आहे. त्या उत्तरासाठी मला माझ्या भटकंतीवरच विसंबून राहावं लागतं. मात्र ठाण्यातील इतर अनेक पुरातन वृक्षांचा वेध घेण्यासाठी पंचाहत्तरीतील वसंतराव उर्फ काका केळकर यांची चांगलीच साथ लाभली.

मित्र हो, जी गोष्ट ठाण्याची, तीच थोड्याफार प्रमाणात आपल्या सर्वच शहरांची आणि प्रदेशांची. आपल्या परिसराची पूर्ण माहिती करून घेण्याचे प्रयत्न खूपच कमी लोकांकडून होतात. त्यामुळेच आपलं पर्यावरण आणि त्यातील पुरातन, मोठ्या, विशाल, दुर्मीळ औषधी वृक्षांचं रक्षण आणि

जोपासना करण्यात आपण खूप कमी पडतो. आता मात्र पर्यावरण शिक्षण या विषयाचा शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात अनिवार्य विषय म्हणून समावेश झालेला आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकही याचा विचार अधिकाधिक प्रमाणात करू लागतील, असा विश्वास बाळगू या.




किल्ला मारुती मंदिर परिसरात जोडीने वाढलेले वड–पिंपळ



कुठल्या वृक्षाला 'पुरातन' म्हणायचं, याविषयी काही दंडक आहेत काय? माझ्या माहितीप्रमाणे नाहीत. मात्र या लेखाच्या संदर्भात किमान शंभर वर्षांहून अधिक जुन्या असलेल्या वृक्षांना आपण पुरातन वृक्ष म्हणू या. पन्नास ते शंभर वर्षं अस्तित्वात असलेल्या वृक्षांना जुने वृक्ष म्हणू या आणि पन्नास वर्षांच्या आतील वृक्षांना नवीन वृक्ष असं संबोधू या.

कापुरबावडी पोलीस स्टेशन परिसरातील त्या वेळी ४४ फूट व्यास असलेला प्राचीन वाओबाब (गोरक्ष चिंच) वृक्ष

प्राचीन (पुरातन) वृक्षांमध्ये खास करून वड, पिंपळ, औदुंबर, आंबा, चिंच, वाओबाव (गोरक्ष चिंच) आदी वृक्षांचा समावेश होतो. (यात मी येऊर परिसरातील रानवृक्षांचा समावेश करत नाही.)

यातील आमच्या नजरेस पडलेले नुसतेच विशालकाय नव्हे, तर सुंदर आणि आकर्षक वटवृक्ष रेमण्ड वूलन मिलमधील शिवमंदिर परिसर व घोडबंदर-कोलशेत-कापूरबावडी मार्गावरील क्लॅरिअन कंपनीच्या अतिथीगृह परिसरात आहेत. थक्क होऊन बघत राहावेत, असेच हे वृक्ष आहेत, खरं म्हणजे या रस्त्यावर असे अनेक पुरातन आणि जुने वृक्ष आहेत. या रस्त्याचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रस्तारुंदीकरण करताना रस्त्याच्या मधोमध येणाऱ्या वृक्षांचा रस्ताविभाजक म्हणून जागोजागी सुंदर उपयोग केलेला आहे.



**रेमंड वूलन मिल्सच्या आवारातील शिवमंदिरावर छत्र धरून असलेला प्राचीन वटवृक्ष**

किल्ला मारुती मंदिर, कोर्ट नाका, नूरीबाबा रस्त्यावरील ठाणे जिल्हा मजूर कार्यालय, वंदना सिनेमासमोरील एसटीचं विभागीय कार्यालय यांच्या परिसरातील सुंदर पिंपळवृक्षांचाही समावेश पुरातन वृक्षांमध्ये करायला हवा. कापूरबावडी पोलिस ठाणे, गडकरी रंगायतन समोरील भावे बंगला, कोपरी पुलाखाली असलेले विशालकाय आणि तुंदिलतनू बाओबाव वृक्षदेखील

(गोरक्ष चिंच) जुने आणि पुरातन वृक्ष यांच्या सीमारेषेवर आहेत. ठाणे ग्रामीण पोलीस आयुक्तालयासमोरील पर्जन्यवृक्षाबरोबरच अनेक पर्जन्यवृक्ष, गिरीष आणि गुलमोहोर यांचा समावेश जुन्या वृक्षांमध्ये करायला हवा. इतरत्र नष्ट होत जाणाऱ्या कैलासपतीचे अनेक वृक्ष रेमण्ड वूलन मिल परिसरात आपल्या नजरेला पडतात. विद्यार्थ्यांनी गटागटांतून आपली विभागणी करत अशा वृक्षांचा शोध घेत त्यावर अनेक शोधप्रकल्प करण्यासारखे आहे. त्यासाठी त्यांना आवश्यक ती माहिती आणि मार्गदर्शन हरियालीकडून अवश्य मिळू शकेल.

आजपासून सुमारे वीसेक वर्षांनंतर ठाण्यातील जुन्या वृक्षांमध्ये पेल्टोफोरम (पीत गुलमोहोर), कदंब, सप्तपर्णी आदी वृक्षांचा समावेश करावा लागेल. वृक्षांच्या वयावरून व त्यांच्या संख्येवरून कोणत्या आयुक्तांच्या कालावधीत त्यांच्या आवडीच्या कोणत्या वृक्षांची अधिक लागवड झाली, याचाही वेध घेता येऊ शकतो. वाढतं शहरीकरण, रस्ता रुंदीकरण, औद्योगिक कारखान्यांच्या जागी गृहसंकुलांची निर्मिती आदी अनेक कारणांमुळे यांतील अनेक वृक्ष भविष्यात दिसनासे होण्याची शक्यता आहे. ते कोणीच टाळू शकणार नाही. मात्र वृक्षांच्या अशा प्रजाती एकदमच नष्ट होणारच नाहीत, अशा दृष्टीने त्यांची पुनर्निर्मिती करणं अजूनही आपल्या हातात आहे, तसं करणं आवश्यकही आहे!

मुंबई टाइम्स, १९ ऑगस्ट २००६

* * *

# ५. ठाणे खाडीलगत होत असलेला बहुचर्चित भराव




सतत टाकल्या जात असलेल्या भरावामुळे आकुंचन पावत असलेली
ठाणे खाडी आणि नष्ट होत असलेले खारफुटीचे जंगल

वैध की अवैध हा प्रश्न वेगळाच! परंतु भिवंडी बायपास रोडवर असलेल्या साकेतजवळच्या पुलावरून दि. १२ मे रोजी सकाळी ९ वाजता घेतलेले हे ठाणे खाडीचे छायाचित्र किती बोलके आहे पाहा. खाडीच्या उत्तर-पूर्व किनाऱ्यालगत सर्वत्र गच्च तिवरे पसरलेले आहे. मात्र त्याच वेळी दक्षिण-पश्चिम किनाऱ्यालगत असलेल्या अशाच गच्च खारफुटीचे झपाट्याने मातीकरण-कॉंक्रिटीकरण करणे चालू आहे. कशासाठी? पोटासाठी! कशासाठी? गृहसंकुले बांधण्यासाठी! ठाणे-मुंबई शहरांवर हल्लाबोल करीत येणाऱ्या लोकांना तात्पुरते तसेच कायमस्वरूपी तळ ठोकायला मिळावेत म्हणून. वाढत्या शहरांमधील राहत्या जागेचा प्रश्न सुटावा म्हणून.







ही सर्व
छायाचित्रे
आपल्या
संग्रही ठेवा.
कधीकाळी
ठाणे
परिसरात
गच्च
तिवरे-खारफूटी
होती हे तुम्हाला
दुसऱ्या
कुणालातरी
दाखवता येईल.
तिवरे आणि
खारफूटीच्या
आजूबाजूला
कालांतराने
कचरा
साठत गेला.
तुमच्या
माझ्यासारख्या
नागरिकांप्रमाणेच
शासनानेही
याकडे
दुर्लक्ष केले
आणि पुढे
काय
परिस्थिती
उद्भवली
हे आपणा
सर्वांनाच
माहित आहे.

ठाणे परिसरात कोणे एके काळी गच्च तिवरे–खारफुटी होती, असे दाखविणारी काही छायाचित्रे आपल्या संग्रही असावीत असे आपल्याला वाटत असले, तर त्वरा करा. बायपास रोडवर असलेल्या पुलावरून त्याचं शेवटचं दर्शन घेऊन या तिवरांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी प्रार्थना करा. होय तेवढं करण्यापलीकडे निद्रिस्त नागरिकांच्या आणि कर्तव्यदक्ष शासनाच्या आणि लोकप्रतिनिधींच्या हातात असतंच काय?

दैनिक सन्मित्र, १७ मे २००६

* * *

# ६. गच्चीवरील बागेतील हिरवा आनंद

ठाणे-मुंबईसारख्या शहरातून बंगला सोडाच, पण आपले एखादे छोटेसे घरकूल असावे, त्याच्या सभोवताली छोटीशी बाग असावी, असे स्वप्न बघणेदेखील आजकालच्या कर्त्या पिढीला दुरापास्त झाले आहे; परंतु किमान दोन-तीन खोल्यांचा आपला एखादा स्वतंत्र फ्लॅट असावा, शक्य झाले तर त्याला जोडून छोटीशी गच्ची असावी किमान बाल्कनी असावी आणि मग त्यात जमतील तेवढ्या फुलझाडांच्या अथवा शोभेच्या झाडांच्या छानशा कुंड्या असाव्यात, असे प्रत्येक मध्यमवर्गीयाचे स्वप्न असते.

पण प्रत्यक्षात मात्र अशा गच्चीचा अथवा बाल्कनीचा उपयोग अडगळीचे सामान ठेवण्यासाठीच होत असलेला आपण बघतो. मात्र मध्येच केव्हातरी सुंदरशी गच्ची लाभलेल्या घरी जाण्याची संधी मिळाली आणि छानशा बागेचे दर्शन झाले, की मन प्रफुल्लित होते. सिमेंटच्या जंगलाने व्यापलेल्या ठाण्यातही अशा हिरव्या टेरेस बागा आढळतात.

घनकचरा निर्मूलनाच्या वेगवेगळ्या प्रकल्पांची खूप चर्चा होते. घराघरांतील स्वयंपाकगृहांतून बाहेर टाकला जाणारा कचरा आपल्याच गच्चीत व्यवस्थितरीत्या तयार केलेल्या वाफ्यावर टाकून त्यातूनच भाजीपाला आणि फळे मिळवू शकणारा एक प्रकल्प ठाण्याच्या मुंदडा दाम्पत्याने पुण्यात बघितला. त्यांना तो भावला आणि कोणालाही सहज अनुकरण करता येणारी ही साधी-सोपी गोष्ट आपण का करू नये, असा विचार त्यांच्या मनात आला आणि घरी परतल्यावर गच्चीची साफसफाई करून उन्हाची दिशा बघून एक कोपरा बागेसाठी निवडला. सोसायटीच्या आवारात इतस्ततः पडलेल्या विटा उचलून वर आणल्या आणि कडेला रचून साधारणतः ५' × ३' असे तीन वाफे केले. म्हणजे जेमतेम १५ चौरस फूट जागा घेतली. गल्लीच्या कोपऱ्यावरील नारळवाल्याकडून थोडा नारळांचा काथा आणून तो पसरला. त्यावर रसवाल्याकडून उसाचे चिपाड आणून ते पसरले. त्यावरच भाजीबाजारातून आधीच्या दिवसाच्या कचऱ्यातला थोडा कचरा, एका गोणीत भरून आणून तो पसरला. या कचऱ्याचे विघटन करणाऱ्या कीटकांचे

'कल्चर' (विरजण) पुण्याहून येतानाच बरोबर आणले होते. ते फवाऱ्यासारखे शिंपडले. त्यावर पुन्हा भाजीपाल्याच्या कचऱ्याचा एक थर टाकला. मग त्यात टाकल्या चार बिया वांग्याच्या, दोन बिया पपईच्या, मिरचीच्या, शिराळ्याच्या, टोमॅटोच्या, तुळशीच्या, वाटाण्याच्या आणि भेंडीच्या. गुलाब, जास्वंद आणि शोभेच्या झाडांची दोन-चार रोपं आणली होती, ती लावली. चिमूटभरही माती नाही. थोडे पाणी शिंपडले आणि संध्याकाळी थकून-भागून झोपले.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून सगळ्यांची पहिली धाव गच्चीकडे. आदल्या दिवशी लावलेली रोपं अजून माना टाकूनच होती. दुसरेही काही अंकुरले नव्हते. पुन्हा थोडे पाणी शिंपडले आणि ते रोजच्या कामाला लागले. संध्याकाळी कामावरून घरी परत आल्यावरही तेच.

मग घरातील सगळ्यांच्या दिनचर्येचा हा भागच झाला. घरातून बाहेर जाणारा कचरा- प्लास्टिक, पत्र्याचे डबे आदी सोडून सर्व काही त्या वाफ्यातच पडू लागले. दुर्गंधी येईल का, डास-मच्छर वाढतील का, ही भीती मनात होतीच, पण तसे काही जाणवत नव्हते. वाफ्यातील कचरा आपोआप खाली बसत होता. तिसऱ्या दिवसापासून रोपांची कांती झळाळू लागली. टाकलेल्या बिया रुजू लागल्या. त्यातून अंकुर बाहेर पडताना दिसू लागले. मग मुंदडा दाम्पत्याच्या आनंदाला पारावाच उरला नाही. आपण लावलेली रोपं तजेलदार होऊ लागली. बिया अंकुरू लागल्या. सगळे आयुष्य शहरातील फ्लॅट संस्कृतीत काढलेल्या या दाम्पत्याने बिया कशा अंकुरतात, रोपं कशी वाढतात, हे कधी जाणीवपूर्वक पाहिलेच नव्हते. इथे तर त्यांनीच लावलेल्या बिया रुजत होत्या. बियांमधून बाहेर पडलेले अंकुर देठावले, उंचावू लागले. आडवे-तिडवे पसरू लागले. महिन्याभरातच शिराळ्यांच्या वेलीवर पिवळी फुले येऊ लागली. मिरची, टोमॅटो, वाटाणे यांच्या रोपांवर फुलं दिसू लागली. फुलांच्या जागी फळे आणि शेंगा दिसू लागल्या. पपईच्या रोपाचे बघता-बघता झाड झाले. झाड आता पपयांनी बहरले आहे. शेजारीपाजारी, मित्रमंडळी येऊन बघू लागली. कचऱ्यातून निर्माण होणाऱ्या या जीवनरसाचे कौतुक होऊ लागले. घरातून बाहेर जाणारा रोजचा कचरा बंद होऊन दर रविवारी बाजारातलाच कचरा घरात आणला जाऊन गच्चीवर पडू लागला. गच्चीवर आलेली भेंडीची, वांग्याची,

शिराळ्याची पहिली भाजी खाताना मुंदडा कुटुंबीयांचा आनंद द्विगुणित होऊ लागला. आता तर त्यांना त्याचे व्यसनच जडले आहे. एवढी वर्षे आपण टाकाऊ समजत असलेला कचरा बाहेर टाकून केवढ्या आनंदाला मुकत होतो, याची जाणीव होऊन मुंदडा दाम्पत्य आता हळहळले. आपला हा प्रयोग अमलात आणायला अगदी सोपा असूनदेखील शेजारीपाजारी अथवा बघायला येणारे इतर लोक त्याचे अनुकरण का करत नाहीत, याचे मुंदडा दाम्पत्याला आश्चर्य वाटते. निसर्गाच्या या आविष्कारात रमल्यामुळे ईश्वराविषयी ओढ निर्माण होऊन अध्यात्म भावना वाढीस लागल्याचा मुंदडा दाम्पत्याचा अनुभव आहे.

मुंदडांच्या गच्चीवरील बाग फार प्रेक्षणीय वगैरे नाही, पण प्रत्ययकारी नक्कीच आहे. साधे-सोपे विज्ञान सहजतेने अमलात आणणारी आहे. जागा उपलब्ध असेल, त्याने अनुकरण करावी अशी आहे. त्यासाठी घराची गच्ची अथवा बाल्कनीच असली पाहिजे, असे नाही. प्रत्येक सोसायटीच्या आवारात सहज करता येणारा हा आनंददायी विज्ञानाधिष्ठित आणि कमी खर्चिक प्रकल्प आहे. त्यातून भाज्या आणि फळे किती मिळतात आणि त्यातून भाजीपाल्याचा खर्च किती वाचतो, हा प्रश्न गौण आहे. कारण तयार होणाऱ्या भाज्या आणि फळं बघून मिळणारा आनंद अनमोल आहे.

लोकसत्ता, ७ ऑक्टोबर २०००

* * *

# ७. फळांनी लगडलेला गच्चीतला करमळ

भाजीला चव यावी म्हणून त्यात एखादा आंबट-गोड पदार्थ टाकण्याची प्रथा भारतातील सर्वच राज्यांमध्ये आणि कुटुंबपद्धतींमध्ये दिसून येते. समुद्रकिनाऱ्यालगतच्या पाकक्रिया तर अशा पदार्थांवाचून पुऱ्याच होताना दिसत नाहीत. मग त्यात स्थळपरत्वे आणि कालपरत्वे वापरावयाच्या अशा पदार्थांत फरक पडत जातो.

महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास विदर्भात आणि खानदेशात चिंच, कोकण-गोव्यात कोकम व ठाणे जिल्ह्यात विशेषतः ग्रामीण आणि डोंगराळ आदिवासी भागात करमळाच्या फळाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. लिंबाचा वापर तर जगभर सर्वत्रच केला जातो.

सह्याद्री पर्वतालगतच्या प्रदेशात कोकम आणि करमळ यांचे वृक्ष मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. करमळाचे फळ सोबतच्या छायाचित्रात दिसते आहे, ते रानातील एखाद्या वृक्षाला आलेले नसून ठाणे शहरात शुभंकरोती हॉलजवळ राहणाऱ्या हुमणे दाम्पत्याच्या गच्चीवरील बागेत असलेल्या छोट्या पिंपातील वृक्षाला आलेले फळ आहे. या वृक्षाला मोठ्या आकाराची पिवळ्या रंगाची फुले येतात आणि त्यातून वरीलप्रमाणे फळे आकार घेतात. झाडाची पाने दातेरी असतात तर फुले भरपूर पुंकेसरयुक्त असतात. कच्ची फळे आंबट तर पिकलेली फळे आंबट-गोड अशा सुंदर चवीची असतात. हीच फळे 'लक्ष्मण फळ' म्हणूनही ओळखली जातात. त्या नावाचे रहस्य मात्र मला उलगडलेले नाही. ठाणे जिल्ह्यातील डोंगराळ भागात करमळाच्या फळांप्रमाणेच अंबाडीची बोंडे, अंबाडीची पाने इत्यादींचा वापरही भाजीत टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. देशभर वापरल्या जाणाऱ्या अशा पाना-फळांची माहिती एकत्र करून प्रसिद्ध केल्यास तो एक उपयुक्त माहितीग्रंथ तयार होऊ शकेल.

लोकसत्ता, ७ ऑक्टोबर १९९९

* * *

# ८. मुंडा डोंगर – एक आव्हान



वृक्षप्रेमींना आव्हान देणारा खडकाळलेला मुंडा डोंगर

ठाणे, घोडबंदर रस्त्याने ठाण्याकडून जाताना जकात नाक्याच्या थोडे पुढे गेले की, काजूपाडा वस्ती लागते. या पाड्याच्या मागे उभा असलेला एक डोंगर आपले लक्ष वेधून घेतो, ते त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक अस्तित्वामुळे.

या डोंगराच्या अलीकडच्या बाजूला ठाणे-घोडबंदर रस्ता, तर पलीकडे ठाणे खाडी आहे. खालपासून जवळजवळ तीन चतुर्थांश उंचीपर्यंत दाट वृक्षराईंनी नटलेल्या या डोंगराचा वरचा मजला रिकामा आहे. डोंगरमाथा उघडा पडलेला असला, तरी वरच्या कातळावर ठिकठिकाणी मातीचा बारीक थर आहे, पण या डोंगराच्या वरच्या बाजूला एकही झाड अथवा झुडूप वाढू शकत नाही, असा या परिसरात राहणाऱ्या लोकांचा गाढा समज आहे. झाड-झुडूप लावण्याचे तसे प्रयत्न झाल्याचेही कोणी सांगत नाही, पण त्या वरच्या भागात काही उगवून टिकूच शकत नाही, अशी ठाम अंधश्रद्धा मात्र



**मुंडा डोंगरावरून दिसणारे उल्हास खाडीचे सुरेख दृश्य**

आहे. झाड टिकू शकत नाही याचे प्रमुख कारण असे संभवते की, या डोंगराचा वरचा भाग जवळपासच्या इतर डोंगरांपासून वेगळा पडलेला असून, तीन बाजूंनी खोलगट दऱ्या आणि एका बाजूने खाडी आहे, त्यामुळे वाऱ्याची दिशा कुठलीही असली, तरी वरती सदैव भन्नाट वारा असतो, त्यामुळे एकेकट्याने उगवलेले रोपटे पुरेशा संरक्षणाअभावी वाढूच शकत नसावे. उगवले तरी त्याच्या मुळांना जमिनीतून पाणी शोषून घेण्याच्या मर्यादेपर्यंत पाणी मिळत नसावे; पण या भागात प्रयत्न केले, तर कण्हेर, जास्वंद, बोगनवेली अशी फुलझाडे; आणि करवंदे, बोरे, जांभूळ इत्यादी प्रकारची फळझाडे आणि काटेरी वृक्ष किंवा ग्लॅरिसिडियासारखी झाडे लावली, तर ती नक्कीच वाढतील आणि डोंगराचे स्वरूप बदलू शकतील.

एवढेच नव्हे तर एक अंधश्रद्धा दूर होऊ शकेल, मात्र हे कोणीतरी मनावर घ्यायला हवे. हा डोंगर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अखत्यारीत येतो. त्या रस्त्यावर दोन अभियांत्रिकी महाविद्यालये, एक तंत्रनिकेतन आणि बऱ्याच शाळा आहेत. आदिवासींच्या हिताचे रक्षण करण्यासाठी अस्तित्वात आलेल्या काही सेवासंस्था आहेत. सामाजिक वनीकरणाच्या अनेक योजना आहेत, मात्र या योजना लोकांपर्यंत पोहोचलेल्या नसतात आणि सेवाभावी संस्थांची सेवा कुठे नजरेत न भरता भाव खाणारे कार्यकर्ते मात्र गावोगावी आढळतात. विद्यार्थिवर्गाने पुस्तकाच्या बाहेर डोकावू नये, असा शिक्षकांचा सर्वसाधारणपणे समज असावा. विद्यार्थीदेखील आपल्यामधील

निर्मितिक्षमतेविषयी अनभिज्ञ असतात. सरकारी खात्यांची दृष्टी नकारात्मक असते, म्हणजे सर्व परिस्थिती प्रतिकूल!

पण म्हणून काय घाबरायचे की हात-पाय गाळून बसायचे? हेच तर खरे आव्हान असते आणि असे आव्हान स्वीकारण्यातच पुरुषार्थही असतो. आपल्या सभोवताली दारिद्र्य नसावे, घाण नसावी, अज्ञानाचे साम्राज्य नसावे, तसेच सभोवतालचे डोंगर उघडे-बोडके नसावेत आणि जमीन पडीक नसावी, यासाठी प्रत्येकाने जाणीवपूर्वक प्रयत्न करत राहायला हवे नाही का? ज्याला जे भावेल, जसे जमेल, तसे त्याने ते करत राहावे, जिथे असे काम चालू असेल, प्रयत्न होत असतील, तिथे सहभागी व्हावे, आपल्याकडून होईल तसे योगदान द्यावे. पावसाळी भ्रमंतीसाठी बाहेर पडताना प्रत्येक व्यक्तीने स्वतः तयार केलेले अथवा स्वतःच्या प्रयत्नांनी मिळविलेले किमान एकेक रोप बरोबर नेऊन, दिसेल त्या मोकळ्या जागेत, येणाऱ्या-जाणाऱ्याला अडचणीचे होणार नाही, अशा प्रकारे लावले तर पर्यावरण रक्षणासाठी वेगळी सभा-संमेलने घ्यावी लागणार नाहीत की वृक्ष-दिंड्या काढाव्या लागणार



मुंडा डोंगराचे आव्हान स्वीकारून वृक्ष लागवड आणि जोपासना करणारे हरियालीचे कार्यकर्ते श्री. प्रदीप लोथे, पडाळकर, चव्हाण आणि इतर

नाहीत. पर्यावरण रक्षणाचे काम विकास योजनांना विरोध करून अथवा 'होऊ देणार नाही' स्वरूपाच्या नकारात्मक चळवळी उभारून नव्हे; तर 'होत कसे नाही? करूनच दाखवीन' ह्या जिद्दीने होणार आहे. मुंडा डोंगराचे हेच आव्हान आणि आवाहनही आहे. आपण ते स्वीकारणार का?



वाढता-वाढता
वाढे वृक्ष

खाडीवरून डोंगरावर जाताना दलदल असते, त्यातील प्रदूषित घटक शोधून हवा शुद्ध करण्याचे काम दलदलीत वाढलेली तिवटेच करत असतात. सर्व अडचणींना तोंड देत ती वाढत असतात आणि आपले काम चोख रितीने बजावत असतात. त्यातलीच काही कारगिलचे रक्षण करणाऱ्या जवानांसारखी



वृक्ष लावल्यानंतर आजूबाजूचे गवत काढणारे हरियालीचे कार्यकर्ते

कधीतरी धारातीर्थीदेखील पडतात. ते जवान आणि त्या तिवटांपासून आपण एवढेदेखील शिकलो नाही, तर आपण 'जीवन जगलो'; असे आपल्याला कसे म्हणता येईल?

खाडीच्या बाजूने येणाऱ्या वाऱ्याबरोबर कधी-कधी नवसागराचा वास येतो. हवेतील प्रदूषणाबरोबरच या सामाजिक प्रदूषणाचेदेखील अस्तित्व समजून घेऊन ते दूर करण्याचा प्रयत्न करायला हवा. त्याची भीती न बाळगता आपण डोंगराच्या दिशेने वर जात राहिलो, तर तेथील जंगली श्वापदांचीही भीती वाटेनाशी होते. अगदी सामोरे नाही आले तरी कंद खाण्यासाठी पोखरलेली जमीन आणि ओरबडलेली, तुडवलेली झुडपे बघितली तर भेकर, रानडुक्कर, ससे इत्यादींचे अस्तित्व सहज जाणवते. कासऱ्यासारख्या जाड वाढलेल्या आणि अनेक वृक्षांना जोडून एकत्र ठेवण्याचे काम करणाऱ्या वेली 'टारझनगिरी' करण्याचा मोह मनाला पाडतात. पण जंगलातून फिरताना अशा मोहाला नेहमीच लांब ठेवायचे.

'मोहा'च्या फुलांच्या संगतीतदेखील जास्त वेळ नाही राहायचे. नाहीतर हा वास आपल्या नाकातून डोक्यात केव्हा शिरतो, ते आपल्याला कळतच नाही (असे म्हणतात).

असल्या मोहाच्या क्षणांमुळे आणि अर्धवट कुजलेल्या पाचोळ्यामुळे थैमान घालणाऱ्या डासांपासून आपले रक्षण करीत, आपण झाडझुडूप न उगवणाऱ्या मुंडा (अथवा मोकळा) डोंगराच्या माथ्यावर येऊन पोहोचतो आणि मग बघता-बघता मोगॅम्बो खूश होतो.




लेखक आणि श्री. सुनील चौधरी मुंडा डोंगरावर वाढत असलेल्या वृक्षासोबत

डोळ्यांत येणाऱ्या पाण्याचे कारण भन्नाट वारा असतो की तेथील निसर्गदृश्य बघितल्यामुळे झालेला अवर्णनीय आनंद असतो? फारशी उंची नसलेला एखादा छोटासा डोंगरदेखील आपल्याला बरेच दृष्टिसुख देत खूप काही शिकवून जातो. वळणा-वळणाचा घोडबंदर रस्ता, डोंगरांमुळे मध्येच तुटक दृश्य होत असलेली खाडी आणि खाडीच्या वळणांमुळे बेटे भासणारे, पण खाडीच्या एकाच बाजूचे डोंगर. पलीकडील कारलाईचा डोंगर, अलीकडील गौळकडा, रस्त्यावरची वाहने, खाडीतील मचवे हे सारे डोळ्यांनी पिऊन डोक्यात आणि मनात जागा मिळेल तिथे साठवून ठेवायचे. सरींवर सरी अंगावर घेत नव्या डोंगराची ओळख करून घेण्यासाठी खाली उतरायचे. तर अशा ह्या मुंडा डोंगराचे आव्हान स्वीकारणार का?

लोकसत्ता, २२ जुलै १९९९

* * *

# ९. निसर्गपूजा :
# एक आमंत्रण आणि आवाहन



बाळकुम पाइप लाइनलगत वटपौर्णिमेस वृक्षलागवडीस सुरुवात

वटपौर्णिमा! ज्येष्ठ महिन्यात येणाऱ्या या पौर्णिमेला वटवृक्षाची पूजा केली जाते. पूजा कोणाची केली जाते? ज्याला आपण श्रेष्ठ मानतो, ज्याच्याकडून काही मागावे आणि ज्याच्याकडे आपल्याला देण्यासाठी काही असावे, ज्याच्याकडून काही शिकवे, ज्याच्या सान्निध्यात राहून आपल्याला आनंद मिळवा, दिव्यत्वाची प्रचिती यावी आणि आयुष्य कारणी लागल्याचे समाधान मिळावे, ज्याला आपण कधीही विसरणार नाही अशी व्यक्ती अथवा निसर्गातील एखादा घटक आणि तत्त्व इत्यादी. सर्वसमावेशक हिंदू धर्मात निसर्गातील अशा प्रत्येक घटकाचे महत्त्व समजून घेऊन त्या-त्या घटकाच्या पूजेचे प्रयोजन केलेले आहे. वटवृक्ष त्यांपैकीच एक. त्याची पूजा का करायची? तर त्याच्यापासून आपल्याला भरपूर प्राणवायू मिळतो. त्याच्याखाली बसून श्रांत मनाला आणि शरीराला विश्रांती मिळते. त्याच्यावर शेकडो पक्ष्यांना घरटी करून राहायला मिळते, खायला मिळते, त्याच्यासारखे मनाने आणि शरीराने मोठे होण्याची प्रेरणा मिळते. पण मुख्य

म्हणजे वटवृक्ष हे एक प्रतीक आहे. कशाचे? तर निसर्गाचे आणि त्यातील सर्व दिव्य गुणांचे आणि स्वरूपाचे.

तर अशा या वटवृक्षाच्या म्हणजेच निसर्गाच्या पूजेचे आयोजन केले आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील येऊर विभागातील वनाधिकारी आणि त्यांचे सहकारी कर्मचारी आणि हरियाली यांच्यातर्फे, हरियाली म्हणजेदेखील केवळ एक संस्था नव्हे, तर ते एक प्रतीक आहे, कशाचे? निसर्गाचे महत्त्व आणि सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या संवेदनशील मनाचे.

पूजा करायची म्हणजे नक्की काय करायचे? अहं! हळद-कुंकू, गुलाल, ऊद, इत्यादी टाकून नव्हे तर प्रत्येकाने एकेक वृक्ष लावून. खड्डे तयार असतील; रोपे पुरविली जातील, अवजारे असतील, आवश्यक असेल ती मदत, मार्गदर्शन उपलब्ध असेल. पक्ष्यांच्या कूजनाची संगीत साथ असेल. त्यांच्या संगीतातही नाद असतो, ताल असतो, पाऊस पडत असला तर उत्तमच. मन भिजून निघत असताना शरीराने कोरडे राहून कसे चालेल? भरपूर भिजा. भिजण्याची भीती बाळगून भिजण्याच्या आनंदाला मुकू नका. कंटाळवाणी भाषणे नसतील; पण आपणही मोठमोठ्याने बोलू नका. केवळ निसर्गाचा आवाज ऐका. काही काळासाठी स्वतःला विसरा, म्हणजे तुम्हांला इतरांचीच नव्हे तर स्वतःचीदेखील खरी ओळख होण्यास मदत होईल. दोन-तीन तास गप्प राहणे खरे म्हणजे तसे अवघडच आहे- विशेषतः बायकांसाठी, पण प्रयत्न केलात तर जमेल. आणि स्वतः न बोलता ऐकत राहण्यात काय अनुभव असतो त्याचा आनंद घ्या. जास्त श्रमू नका. पण एक झाड स्वतः अवश्य लावा, खड्डे कमी पडले तर निराश नका होऊ, आपण तेही खणून काढू असा आत्मविश्वास बाळगा.

वटपौर्णिमा जरी सोमवारी (तारीख २८ जून) असली, तरी आपल्या सोयीसाठी हा कार्यक्रम आदल्या दिवशी म्हणजे २७ जून १९९९ रोजी सकाळी सात वाजता ठेवला आहे. मातीत हात भरतील, कपडे खराब होतील, पावसाने भिजू अशी भीती बाळगणाऱ्या सगळ्यांनाच बरोबर घेऊन या. आल्यावर मार्गदर्शन होईल- त्या दिशेने आणि त्या ठिकाणी जाऊन दिले जाईल. त्या झाडाचे रोप लावा, अमुकच झाडाचे रोप लावीन असा हट्ट धरू नका, रुसू सका. झाड लावताना ऋग्वेदातील एखादी ऋचा अथवा प्रार्थना येत असली तर अवश्य म्हणा, पण हळू आवाजात बोला. झाड लावून

झाल्यावर पडत्या अथवा वाहत्या पाण्यात हातपाय स्वच्छ धुवा आणि नियोजित स्थळी येऊन बसा. एकमेकांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून स्वतःचा आनंद द्विगुणित करा.

येताना स्वतःच्या वापरासाठी पाणी भरलेली एक बाटली, माफक नाश्ता, कॅमेरा, दुर्बिण, इत्यादी घेऊन या. परत जाताना आपण लावलेल्या झाडाशिवाय आणि आपल्या सहवासाच्या सुगंधाशिवाय काहीही मागे सोडू नका. अगदी रिकाम्या बाटल्या, प्लॅस्टिकच्या पिशव्या, रद्दी कागद, सिगारेटचा धूर इत्यादी काहीही मागे ठेवून जाऊ नका. येणाऱ्या लोकांमध्ये मिसळून त्यांचा परिचय करून घ्या.

आणि हो! पुन्हा-पुन्हा या, येत राहा. आपण लावलेल्या झाडांना, आपण जन्म दिलेल्या बाळांना असेच का वाऱ्यावर सोडून देणार? त्यांची काळजी घ्यायला, देखभाल करायला पुन्हा-पुन्हा येत जा. कुठे ते सांगायचं राहिलंच की! कोकणीपाडा-मानपाडा विभागातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आकार घेत असलेल्या हरियाली आदर्शवनातील दर्शनी तलाव गणेशसागरजवळ. आपल्याकडे काही चांगली रोपे तयार असली तर तीदेखील येताना घेऊन या.

सकाळ, २६ जून १९९९

* * *

# १०. पटली ओळख छायाचित्रांतील ठिकाणांची ?




कोंकणीपाड्यातील हरियालीविकसित गणेशसागर

मित्रांनो, सर्व निसर्गप्रेमींचे तेच तर दुःख आहे! आपल्या ठाणे शहराच्या परिसरात एवढी सुरेख ठिकाणे आहेत. आणि इथे काय नाही? धबाधबा पडणारे धबधबे, खळाळत वाहत जाणाऱ्या पावसाळी नदुकल्या, निसर्गनिर्मित तसेच मानवनिर्मित तलाव, घनदाट वृक्षराई, पावसाळी फुलांच्या वनस्पती, बिबळ्याच्या गुहा आणि सुंदरसुंदर पक्षी, एके काळी सुरेख असलेली आणि आता; प्रदूषणाचे मूर्तिमंत उदाहरण असलेली २० किलोमीटर लांबीची खाडी. आम्ही या निसर्गरम्य परिसरात कधी चुकूनमाकून गेलोच तर तिथेदेखील प्लॅस्टिकच्या पिशव्या, भेळपुरीचे कागद आणि पेप्सीच्या रिकाम्या बाटल्या आणि प्लॅस्टिकचे डबे यांच्या स्वरूपात आपली आठवण म्हणून ठेवून येतो. आम्ही आमच्या या घाणेरड्या सवयी बदलणार आहोत की नाही, कधी?



कोकणीपाड्यातील हरियाली तलावाच्या पार्श्वभूमीवर लेखक आणि तत्कालीन मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे वनवृत्त, श्री. श्रीभगवान



कोंकणीपाडा परिसरातील हरियालीविकसित एक सुंदर पक्षीसरोवर

सदरची तिन्ही छायाचित्रे आहेत ठाण्याच्या मानपाडा विभागातील हरियाली डोंगरांच्या कुशीतील, हरियाली विकसित तलावांची. हे तलाव निर्माण झाले आहेत शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून. त्याचबरोबर तिथे वाढताहेत अशा पद्धतीने लावलेले हजारो वृक्ष आणि आकार घेत आहे एक सुरेख राष्ट्रीय उद्यान. सकाळी लवकर गेलात तर विविध पक्ष्यांचे सुंदर कूजन ऐकायला मिळते. ठरावीक ठिकाणी रात्रीच्या टेहळणीसाठी बसलात, तर जगंलराजांचे दर्शनदेखील होते. कधी तरी सहज फिरायला या. काय हरकत आहे आपणही आपापल्या परिसरात वर्षातून प्रत्येकी किमान दहा-दहा झाडे लावायला? काहीही न करता त्यातले एक तरी वाढेल ना?

दैनिक सन्मित्र, १ ऑक्टोबर १९९८

* * *

# ११. ठाणे जिल्ह्याचे पर्यावरण अजूनही सावरता येईल!

पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते आपल्या पर्यावरणाचे मूलभूत घटक आहेत. या पाचही घटकांचा सुरेख वरदहस्त ठाणे जिल्ह्याला लाभलेला आहे. वार्षिक सरासरी ८० इंचाहून अधिक पाऊस (अगदी २५ वर्षांपूर्वीपर्यंत हा आकडा शंभरावर होता) सरासरी एक हजार मीटर उंचीचे सुंदर आणि वृक्षाच्छादित डोंगर, औषधी वनस्पतींनी परिपूर्ण असलेली वने, जैविक विविधतेने संपन्न असलेला जंगल परिसर, तानसा, वैतरणा, भातसा, उल्हास, काळू, सूर्या, पिंजाळ, काशेळी अशा लांबीने कमी परंतु भरपूर पर्जन्यमान असलेल्या डोंगरातून फेसाळत धावणाऱ्या नद्या, त्यांच्या मुखाशी तयार झालेल्या खाड्या आणि त्यालगतची गच्च तिवरांची जंगले, १२२ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा, भरपूर सूर्यप्रकाश, तरीदेखील आजही ४० सेंटीग्रेडच्या पुढे न जाणारे तापमान असे सुरेख प्राकृतिक स्थान ठाणे जिल्ह्याला प्राप्त झाले आहे. देशाच्या फारच थोड्या विभागांना असे छान प्राकृतिक वरदान मिळालेले आहे.

ऐतिहासिक वारसा आहे तो वेगळाच! परंतु पंचमहाभूतांचा सुरेख अविष्कार बघायला मिळणारा आणि जागोजागी संपन्न इतिहासाच्या खुणा दर्शविणारा भूगोल असा सुरेख वारसा ठाणे जिल्ह्यातील आजच्या कर्त्या पिढीला मिळालेला आहे.



ठाणे जिल्ह्यात होत राहणारी अवैध वृक्षतोड

निसर्गाचे एवढे वरदान लाभलेले असूनही जिल्ह्याचे राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रात स्थानिक पातळीपासून राज्य ते राष्ट्र स्तरावर प्रतिनिधित्व करणाऱ्या नेतृत्वास ठाणे जिल्ह्यास राज्यात महत्त्वाच्या स्थानावर नेता आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. एवढेच नव्हे तर जिल्ह्यातील ढासळत चाललेले पर्यावरण ही आजच काळजी करण्यासारखी बाब झालेली आाहे आणि वेळीच काळजी घेतली नाही, तर नजीकच्याच काळात ही परिस्थिती नुसतीच गंभीर नव्हे तर भीषण रूप धारण करू शकेल याची जाणीव सर्व संबंधितांना आणि नागरिकांना करून द्यावीशी वाटते.

जिल्ह्याचे पर्यावरण ढासळत चालले आहे, असे कशावरून म्हणायचे? त्यासंबंधी काही आकडेवारी अथवा काही शास्त्रीय आधार आहे काय? तशी



**ठाणे जिल्ह्यातील वनांमध्ये लागणाऱ्या (मानवनिर्मित) आगी आणि त्यामुळे होणारी वृक्षांची आणि प्राण्यांची होरपळ**

आकडेवारी अथवा दीर्घ संशोधनावर आधारित काढलेली अनुमाने निदान माझ्या तरी माहितीत नाही. परंतु सर्वसाधारणपणे सहज नजरेत भराव्यात आणि त्यावरून अशा निष्कर्षावर येणे भाग पडावे अशा काही गोष्टींचा मात्र मुद्दाम उल्लेख करून त्याचा आधार घ्यावासा वाटतो.

अध्यापक, प्राध्यापक, अभ्यासू, जिज्ञासू व लोकसेवा आयोग आणि निवड मंडळांचे परीक्षार्थी यांना उपयुक्त अशा 'महाराष्ट्रातील जिल्हे' या अनिरुद्ध प्रकाशनाने २००१ साली प्रसिद्ध केलेल्या सुधारित पुस्तकातदेखील ठाणे जिल्ह्याचे सर्वसाधारणतः वार्षिक तापमान २३ अंश सेंटिग्रेड ते ३१ अंश सेंटिग्रेड इतके असल्याचे लिहिलेले आहे. म्हणजे एके काळी ते नक्कीच तसे असावे. कारण आता गेली पाच वर्षे हे तापमान एप्रिल-मे महिन्यांमध्ये



दुर्दशेच्या फेऱ्यात सापडलेले ठाण्यातील खड्डाळलेले रस्ते आणि घाणीचे आगर झालेले ठाणे शहरातील दुर्गंधीत नाले



संघटित प्रयत्नांमधून करता येणारी वृक्षलागवड

सातत्याने ३७ अंशांवर असते. मी स्वतः १९६० पासून ठाणे-मुंबई परिसरातील वाढत जाणाऱ्या तापमानाकडे लक्ष ठेवून आहे. गेल्या ४० वर्षांत मला एकदाही कोणी असे म्हटल्याचे खातरीपूर्वक आठवत नाही की, 'गेल्या वर्षापेक्षा यंदाचा उन्हाळा अधिक सुसह्य आहे.' सातत्याने वाढत जाणारे तापमान हे ढासळत चाललेल्या पर्यावरणाचे प्रमुख लक्षण आहे. परिसरातील ज्या डोंगरांवर दहा वर्षांपूर्वी वृक्ष दिसत असत, गच्च हिवराई नजरेत भरत असे, त्या डोंगरांवरील खडक आज उघड्या-बोकड्या अवस्थेत डोळ्यांसमोर यायला लागले आाहेत. प्रचंड प्रमाणावर होणाऱ्या वृक्षतोडीचा हा परिणाम आहे. यामुळे झाडांच्या मुळाद्वारे जमिनीत पाणी शोषले जाऊन जमिनीखालील पाणी साठण्याचे प्रमाण कमी होऊ लागले आणि म्हणूनच ज्या भागातील विहिरींना आधी उन्हाळ्यातदेखील ३० फूट खोलीवर पाणी असायचे. तिथे आता ५०-५० फूट खोल असलेल्या विहिरीदेखील कोरड्या पडताना दिसताहेत. बोअर खणल्यानंतर १०० फुटांवर जिथे पाणी लागत असे तिथे आता चक्क पाच-पाचशे फूट खाली जाऊनदेखील पाणी मिळेनासे झाले आहे. हेदेखील ढासळत्या पर्यावरणाचे गमक आहे.



दगड
काढून झालेल्या
खाणींचे तलावात
रूपांतर करता
येऊ शकते

जमिनीवर असलेले तलाव एकेक करून नष्ट तरी होत आहेत किंवा त्यातील पाणी प्रदूषित तरी होत आहे. ठाणे शहर आणि परिसर याचे उत्तम उदाहरण आहे. याविषयी मी अनेक वेळा लिहिले आहे. एके काळी साठाहून अधिक सुंदर आणि विस्तृत तलाव असलेल्या या परिसरात जेमतेम दहा ते बारा तलाव विलक्षण आकुंचित स्वरूपात आपल्या दृष्टीस पडतात. त्यातील मासुंदा, कचराळी आणि उपवन हे तलाव सोडले; तर इतर तलावांत पाणी शोधावे लागेल. एवढे ते शेवाळ, वनस्पती आणि प्लास्टिकच्या पिशव्य यांनी गच्च भरलेले असून प्रदूषित झालेले आहेत. त्यामुळे पाणी आहे, परंतु आग विझविण्यासाठीदेखील ते वापरले जाऊ शकत नाही अशी या तलावांची आज केविलवाणी अवस्था होऊन बसली आहे.

वृक्षांचा
बचाव करत
रस्ते रुंद केले
जाऊ शकतात!



वृक्ष तोडून, जाळून उजाड झालेले डोंगर खडी फोडणाऱ्या यंत्रांच्या स्वाधीन होऊन छिन्न-विच्छिन्न होताना दिसत असतात. ठाणे-घोडबंदर रस्ता, ठाणे-तुर्भे रस्ता, पश्चिम द्रुतगती मार्ग इत्यादी सर्वच रस्त्यांलगतचे डोंगर अशा भकास नजरेने आपल्याकडे बघत असतात.

नद्यांमधून समुद्राकडे पाणी वाहणे बंद झाले असून समुद्राकडील पाणी नद्यांच्या मुखातून वरवर चढताना दिसते. दुसऱ्या बाजूला सर्वच खाड्यांच्या परिसरातील तिवरांची प्रचंड प्रमाणात तोड होत असलेली दिसते. शहरातील प्रचंड प्रमाणातील घनकचरा खाड्यांमध्ये ओतत राहिल्यामुळे खाड्या नुसत्याच आकुंचित होत आहेत असे नव्हे तर त्या प्रचंड प्रमाणात प्रदूषितदेखील होताहेत. त्यामुळे त्या परिसरातील जैविक सृष्टीचा फार मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होत आहे. आपल्या परिसरातील पक्षी दिवसेंदिवस नष्ट तरी होताहेत किंवा दूरवर स्थलांतर तरी करताहेत आणि मग त्यांचे सौंदर्य टिपण्यासाठी आपल्यालाच पक्षी अभयारण्याकडे धाव घ्यावी लागते! आणि त्या पक्ष्यांना भीती कोणाची वाटते? माणसांची! अभय कोणापासून हवे असते? माणसापासून!

वाढत जाणारे तापमान, नष्ट होत जाणारी वृक्षराई, ऱ्हास होत जाणारे डोंगर, खाली-खाली जात असलेली पाण्याची पातळी, कोरड्या पडत चाललेल्या नद्या, रुंदी कमी पण लांबी वाढत चाललेल्या खाड्या, नष्ट होत चाललेले तलाव आणि दूषित होत चाललेले पाणी, कमी होत जाणारे सरासरी पर्जन्यमान, नष्ट होत जाणारी वने, ही सर्व ढासळत्या पर्यावरणाची लक्षणे आहेत!

त्याची कारणे अनेक असली, तरी वाढते शहरीकरण, प्रचंड प्रमाणावर होत राहणारी वृक्षतोड, डोंगरफोड, नद्यांच्या परिसरात उभारले जाणारे विविध प्रकारच्या रसायनांचे कारखाने इत्यादींचा खास उल्लेख करायला हवा. पाण्याचा उपयोग - मग ते नदीतील असो अथवा तलाव-विहीर-खाडी यांचे असो- सर्जनापेक्षा विसर्जनासाठी अधिक होत असल्यामुळे ते पाणी दूषित होणारच. यांपैकी प्रत्येक गोष्ट करत राहण्यामागची कारणे वेगवेगळी असू शकतात. परिणाम मात्र एकच होत असतो. पर्यावरणाचे नुकसान! आणि पर्यावरणाची ही हानी जेवढ्या भयानक वेगाने होत असते, तेवढ्या वेगाने त्याचे पुनर्भरण मात्र होऊ शकत नाही. हे समजून घेतले तर ती हानी भरून काढण्याऱ्या उपायांचा विचार करण्याआधी ती हानी करणाऱ्या वरील गोष्टी

करण्याचे टाळत राहणे किती महत्त्वाचे आहे, हे आपल्या लक्षात यावे. तसे झाले तरच पर्यावरणाच्या ऱ्हासाचा हा ढासळत चाललेला आलेख स्थिर होऊन मग तो परिसरातील सौंदर्य आणि अर्थव्यवस्थेतील सुबत्ता यांच्या दिशेने सरकू लागेल. कारण नष्ट होत जाणारा निसर्ग भ्रष्ट समाजाला निमंत्रण देतो आणि भ्रष्ट समाजच निसर्गाला नष्ट करत असतो. भ्रष्ट होत जाणारा समाज आणि नष्ट होत जाणारा निसर्ग हे असे एकमेकांशी जोडलेले असतात.

या दोन्ही गोष्टी टाळायच्या असतील आणि या सर्व प्रश्नांची उकल करायची असेल, तर त्यासाठी समाजातील सर्वच घटकांनी पुढे येऊन एकत्रितरीत्या रचनात्मक कार्याचा ध्यास घ्यायला हवा. नकारात्मक आंदोलनांना यापुढे कायमची मूठमाती द्यायला हवी आणि हे काम करण्याची जबाबदारी उचलायला आता विद्यार्थ्यांनीच अधिकाअधिक पुढे यायला हवे, कारण जोवर छात्रशक्ती मनावर घेत नाही, तोवर कुठलीही सकारात्मक चळवळ यशस्वी होऊ शकत नाही हा इतिहासाचा धडा आहे. हे सर्व कसे करता येईल किंवा अशा सकारात्मक आणि रचनात्मक चळवळीची दिशा काय असावी, याचा आपल्याला वेगळा विचार करायला लागणार आहे. त्याला एकाच लेखाच्या मर्यादेत बसवणे अवघड आहे.

मात्र या विषयावर अभ्यासपूर्ण बोलायला, लिहायला, विचार करायला आणि प्रत्यक्ष कार्य करायला अधिकाधिक युवक ज्या प्रमाणात पुढे येत आहेत, ते बघता पर्यावरणाचा हा ऱ्हास इथेच थांबून ही चक्रे आता लवकरच योग्य त्या दिशेने फिरू लागतील, असे मानायला जागा आहे. अज्ञात भविष्यातदेखील आशेचा किरण लवलवतो आहे.

जी परिस्थिती ठाणे जिल्ह्याची तीच थोड्याफार फरकाने महाराष्ट्राची आणि संपूर्ण भारताची आहे, हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

दैनिक गावकरी, १६ जुलै २००३

* * *

# १२. वणव्यांची तमा न बाळगता वृक्ष लावणारे हजारो हात हवे आहेत!

इसवीसन २०१५ मधील ठाणे शहराची पर्यावरणासंबंधी काय परिस्थिती असेल, याचा अंदाज बांधण्यापूर्वी या शतकातील आजचे पर्यावरण कसे आहे, याची माहिती असणे आवश्यक आहे.

पर्यावरण म्हणजे नुसतेच वातावरण आणि त्यातील हवा नाही आणि नुसतीच सभोवतालची झाडे-झुडपे नाहीत. ते त्यातील महत्त्वाचे घटक आहेत. या पर्यावरणात समावेश होतो समग्र परिसराचा. शहराची रचना, त्यातील रस्ते, इमारती, निसर्ग, पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था आणि वाहतूक व्यवस्था, इत्यादी सर्व गोष्टींचा विचार केल्याशिवाय पर्यावरणाचा विचार करता येणार नाही. एखाद्या शहराचे पर्यावरण कसे आहे, ह्याचे मोजमाप करण्याचा प्रमुख दंडक म्हणजे तेथील हवा आणि परिसर हे आहेत.



लोणाड येथील हरियाली वनविकास प्रकल्पावर
लागलेली आग विझवण्याचे प्रयत्न करणारे बळीराम भामरे

हवेत प्रदूषण असले, परिसरात अस्वच्छता असली; तर तिथले पर्यावरण ढासळलेले आहे असे आपण म्हणतो.

१९९७मध्ये झालेल्या एका पाहणी अहवालानुसार ठाणे शहरातील हवा मुंबईपेक्षा अधिक प्रदूषित असल्याचे आढळून आले आहे. तसेच येथील वृक्षराईंचे प्रमाणदेखील खूपच कमी झाल्याचे आढळून आले आहे. गेल्या २५-३० वर्षांत येथील हवामानातदेखील खूपच बदल झाला आहे, असे जुने रहिवासी सांगत असतात. अरुंद रस्ते, त्यावरील अतिक्रमणे, कोलमडलेली वाहतूक व्यवस्था, घाणीचे ढिगारे, वाढत्या झोपडपट्ट्या, वातावरणात मिसळलेले नाना तऱ्हेचे गंध आणि आवाज, रस्त्यांवर हिंडणारी मोकाट गुरे आणि कुत्री, दुर्गंधीयुक्त पाणी ओसंडून वाहणारे उघडे नाले, रस्त्यालगत आणि मोकळ्या जागांवर होणाऱ्या प्रातर्विधिक क्रिया या सर्व गोष्टींनी ठाणे शहर बरबटलेले आहे. त्यामुळेच मुंबई किंवा इतर कुठल्याही औद्योगिक शहरांपेक्षा ठाणे शहरातील पर्यावरण किंवा खरे म्हटले तर पर्यावरणातील ठाणे शहर आज वेगळे नाही. परिसर विद्रूप करण्यात ह्या सर्व गोष्टींनी आपापल्या परीने गेली पन्नास वर्षे हातभार लावला आहे आणि हे असेच चालू राहिले, तर पुढील पंधरा ते वीस वर्षांत ही परिस्थिती अधिकच खालावणार आहे. दरवर्षी सरासरी अर्धा डिग्री सेल्सियसप्रमाणे येथील हवामानात उष्णता वाढत राहणार आहे आणि जमिनीखालील पाण्याची पातळी दरवर्षी किमान एकेका फुटाने खाली जात राहणार आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे बाहेरून येणारे लोकांचे लोंढे आणि स्थानिक लोकांची कर्तबगारी यांमुळे लोकसंख्या वाढत जाणार आहे. त्यामुळे नागरी सुविधांवर अधिकाधिक ताण पडत राहून त्यांची कमतरता भासणार आहे. शहरातील अस्वच्छता साथीचे रोग पसरवून मृत्यूचे थैमान घालण्यास केव्हा कारणीभूत होईल, हे सांगता येत नाही. कर्त्या तरुण पिढीचे एका वेळचे जेवण आत्ताच दोन पोळ्या आणि अर्धी मूद भातावर आले आहे. समाजात लोकशाही रुजलेली असली, तरी सामाजिक स्वास्थाची जाण आणि कळकळ असलेले सक्षम लोकप्रतिनिधी निवडून देण्याची क्षमता या समाजात दिसून येत नाही. त्यामुळे या परिस्थितीत सुधारणा होण्याची शक्यता दिसत नाही.

मात्र, हे असे होत राहणार आहे का? या विध्वंसक घटकांना आळा घालणारे दुसरे पर्याप्त घटक या वातावरणात नाहीत का? पर्यावरणाच्या

ढासळत्या बुरुजांना आधार देऊन सावणारे आणि त्यांना मजबूत करणारे कारागीर निसर्गात आणि या समाजात नाहीतच का? काय करायचे; कोण करेल आणि कसे करता येईल, जेणेकरून इसवी सन २०१५मधील ठाणे शहरातील नागरिक पर्यावरणाच्या बाबतीत आजच्यापेक्षाही अधिक सुखी होण्याची शक्यता नसली तरी निदान अधिक दुःखी होणार नाहीत?

खरे म्हणजे, समाजातील वाढत्या भ्रष्टाचाराप्रमाणेच वातावरणातील ढासळणारे पर्यावरण ही समस्या एखादे शहर, राज्य अथवा राष्ट्र यांपुरतीच मर्यादित राहिलेली नसून तिने आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण केले आहे. तरीदेखील ठिकठिकाणच्या स्थानिक परिस्थितीप्रमाणे तिच्यावर कमी-अधिक प्रमाणात मात करता येणे शक्य आहे आणि त्याच दृष्टिकोणातून आपण शहराचा विचार करायचा आहे.

समृद्धीसाठी औद्योगीकरणात वाढ होणे अवश्यक असते. औद्योगिकीकरणाच्या वाढीतून निर्माण होणारे प्रदूषण आपल्याला सर्वस्वी टाळता येणे शक्य नाही. प्रदूषणविषयक आवश्यक कायदे करून व त्याची



समाजातील सर्व घटकांना प्रेरित करत वृक्षवर्धन करायला हवे.
(हरियालीच्या भवाळे-लोणाड वनविकास प्रकल्पात योगदान करणारे शालेय विद्यार्थी)

कठोर अंमलबजावणी करत राहून प्रदूषणावर थोड्याफार प्रमाणात अंकुश ठेवता येणे शक्य असते. तसेच समृद्धीबरोबर पेट्रोलवर व डिझेलवर चालणाऱ्या वाहनांची संख्यादेखील सतत वाढतच राहणार आहे आणि तद्जन्य प्रदूषणदेखील वाढतच राहणार आहे.

या सर्व प्रदूषणावर मात करण्याची क्षमता निसर्गातच आहे आणि निसर्गाचे रक्षण आणि वृद्धी करणे मानवावर अवलंबून असते. या निसर्गातले प्रमुख घटक म्हणजे सभोवतालची हिरवळ, वाहते पाणी तसेच तलावांमधील साठवलेले व स्वच्छ ठेवलेले पाणी, भूगर्भाखालील पाण्याचे साठे हे होत. याबाबतीत ठाण्याची भौगोलिक परिस्थिती नुसतीच फार चांगली आहे, असे नव्हे तर त्या दृष्टीने ठाणे नुसत्या महाराष्ट्रातील नव्हे तर सर्व भारतातील सर्वाधिक सुंदर शहर बनण्याची क्षमता ठेवून आहे. शहराच्या तीन बाजूंनी सुंदर, उंच डोंगर. पावसाळ्यात त्यातून खळाळत वाहत जाणारे पाणी, अगदी शहरालगत असणारी वीस किलोमीटर लांबीची खाडी, शहर आणि शहरासभोवती असलेले अनेक तलाव असे पर्यावरण भारतातल्या किती शहरांच्या वाट्याला आले आहे?

संबंध मुंबईला आणि ठाणे शहराला प्राणवायूचा पुरवठा करणाऱ्या आणि एकशे दहा चौरसकिलोमीटरवर पसरलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा अर्ध्याहून अधिक भाग ठाणे शहराचा अविभाज्य भाग आहे, याची ठाणे शहरातील किती नागरिकांना जाणीव आहे? मात्र या उद्यानात दरवर्षी जेवढे वृक्ष लावले जतात, त्यापेक्षा कितीतरी अधिक तोडले जातात किंवा नष्ट केले जातात ही वस्तुस्थिती आहे. कधी न विझणारी पोटाची आग शमविण्यासाठी या डोंगरावर याच दिवसांमध्ये ठायीठायी आगी लावल्या जातात. पोटाचा न भरणारा खळगा बुजविण्यासाठी या डोंगरावरची माती चोरली जाते अन् दगड फोडले जातात आणि मग त्यात भस्मसात होतात, नष्ट होतात प्राणवायूचा पुरवठा करणारे कोट्यवधी रुपये किमतीचे वृक्षरूपी कारखाने! त्यात भर म्हणूनच या उद्यानावर सर्व बाजूंनी आक्रमण होत आहे. देशाच्या कानाकोपऱ्यांतून येणाऱ्या लोकांच्या लोंढ्यांकडून! हे सर्व थांबविता आले तर नुसतीच प्रदूषणावर मात करता येईल असे नव्हे तर शहराच्या सौंदर्यातही भर टाकता येईल. मात्र त्यासाठी आवश्यकता आहे ती तरुण, संवेदनशील मनाची आणि वणव्यांची तमा न बाळगता, वृक्ष लावणाऱ्या हजारो हातांची!

जळत्या डोंगरांबरोबर शहर आणि सभोवतालचे तलाव पोरके झाले आहेत. त्यात साठलेल्या पाण्याचा उपयोग सर्जनापेक्षा विसर्जनासाठीच अधिक होत असतो. त्यामुळे त्यातील पाण्याचा साठा दिवसेंदिवस कमी होतो आहे आणि गाळात मात्र वृद्धी होत आहे. हे थांबविण्याची क्षमता आमच्या समाजात आहे का?

ज्या खाडीचा उपयोग तरुणांचे साहसपूर्ण क्रीडाप्रकार वाढविण्यासाठी आणि पक्ष्यांना आकृष्ट करण्यासाठी व्हावा, तिचा उपयोग कारखाने आणि शहरातील सांडपाणी सोडण्यासाठी होत असतो. त्यामुळे निसर्गातील हे घटक प्रदूषणाला अटकाव करण्याचे काम करणार कसे?

निसर्गातील या घटकांबरोबर इतरही काही घटक या प्रदूषणाला अटकाव करण्याचे काम करू शकतात. ते म्हणजे, जागरूक शासन, कार्यक्षम अधिकारी, सुजाण नागरिक, सामाजिक जाणिवा जागत्या ठेवून पर्यावरणविषयक काम करणाऱ्या सेवाभावी संस्था, लोकशिक्षणाचे कार्य जबाबदारीने पार पाडणारी प्रसिद्धी माध्यमे आणि आपल्या भवितव्याविषयी जागरूक असणारे तरुण आणि बाल विद्यार्थि-विद्यार्थिनी. शेकडो हितसंबंधी लोकांचे शिव्याशाप खात शहरातील अतिक्रमणे आणि घाण दूर करणारे अधिकारी लाखो लोकांच्या सदिच्छाच मिळवितात. दुसरीकडे हितसंबंधी लोकांचे दडपण आणि प्रलोभनांना बळी न पडता वनजमिनीवरील अतिक्रमणे उठविण्याचे आणि मानवनिर्मित वणव्यांपासून वृक्षांचे रक्षण करणारे कार्यक्षम अधिकारीदेखील दिसतात. वृक्षवृद्धी आणि पर्यावरणविषयक जागरूकता निर्माण करणाऱ्या हरियाली, होप, जिज्ञासा यांसारख्या संस्थादेखील कार्यरत होताना दिसत आहेत. शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थि-विद्यार्थिनी त्यांच्या कार्यात हिरिरीने सहभागी होताना दिसतात. त्यामुळे ढासळत्या पर्यावरणामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांची जाण नागरिकांमध्ये येताना दिसते आहे. अधिकारिवर्गाला आपले अधिकार आणि सामर्थ्य यांबद्दलची जाणीव निर्माण होताना दिसत आहे. तरुणांमध्ये दर्जेदार जीवन जगण्याची अभिलाषा निर्माण होताना दिसत आहे.

वृत्तपत्रे, दूरदर्शन या माध्यमांतून पर्यावरणविषयक कार्यक्रमच नव्हेत तर मालिकाच लोकांपुढे येताना दिसताहेत.

अशा वेळी शहरातील प्रदूषण वाढविणारे आणि याला अटकाव करणारे घटक यांपैकी कोण अधिक कार्यरत राहून आपल्या क्षमतेचा अधिकाधिक उपयोग करण्यात यशस्वी होतात, यावर अवलंबून असणार आहे इसवीसन २०१५मधील ठाण्याचे पर्यावरण!

मात्र आज सुजाण नागरिकांना एवढेच सांगावेसे वाटते की, वेळीच जागे व्हा. आपला परिसर नष्ट होऊ देऊ नका. परिसर नष्ट झाला तर समाज भ्रष्ट होतो आणि समाज भ्रष्ट झाला तर सृष्टी नष्ट होते, हे लक्षात ठेवा.

लोकसत्ता, १३ मार्च १९९८

* * *

# १३. स्वच्छ शहरे– जबाबदारी कोणाची?

सालाबादप्रमाणे ठाणे व मुंबई येथील नवनिर्वाचित महापौरांनी शहरे स्वच्छ ठेवण्यासाठी केलेले आवाहन सर्व नागरिकांच्या वाचनात आले असलेच. या वेळच्या आवाहनांची दोन वैशिष्ट्ये म्हणजे मुंबईच्या महापौरांनी हातात झाडू घेतला आणि दुसरे म्हणजे सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, इत्यादी प्रकरांसाठी शासनाचे प्रतिनिधी नागरिकांना जागच्या जागी भारी दंड करणार. कल्पना चांगली आहे.

पण आपण सोबत दिलेल्या तालिकेवरही एक नजर टाकू या आणि मग कोणी, कोणाला, किती, का आणि कशासाठी दंड करणे न्याय्य ठरेल; तेही आपल्या लक्षात येईल.

| **दुर्दशा/घाणीचे स्वरूप** | **कारणीभूत घटक** | **निवारण्याची जबाबदारी** |
|---|---|---|
| मोकळ्या जागा, रस्ते आणि पदपथावरील आक्रमण. | वाढती लोकसंख्या, बाहेरून येणाऱ्या लोकांचे लोंढे, नियोजनाचा अभाव, शासनाची व महानगरपालिकेची निष्क्रियता. | राज्य व शहर शासन. |
| रहदारीची कोंडी, वेडीवाकडी उभी केलेली वाहने. | वाहनांची वाढती संख्या, अरुंद रस्ते, उकरून ठेवलेले रस्ते, रस्त्यावरील मातीचे ढिगारे. | राज्य व शहर शासन. |
| उकरून ठेवलेले रस्ते व मातीचे ढिगारे. | शहर शासन, बेस्ट, टेलिफोन यंत्रणा. | शहर शासन. |
| महामार्ग, रेल्वेलाइन, पाइपलाइन व इतर मोकळ्या ठिकाणी होणारी प्रातर्विधी क्रिया. | वाढती लोकसंख्या, सार्वजनिक शौचालयांचा अभाव, शहर शासनाची बेपर्वाई. | शहर शासन. |
| राहत्या झोपडपट्ट्या. | शहरात येणाऱ्या लोकांचे लोंढे, भडकती महागाई, जागेची टंचाई आणि औद्योगिक वाढ. | राज्य व शहर शासन. |
| ठिकठिकाणी साचलेली घाण, सांडपाण्याची डबकी, कचऱ्यांचे ढिगारे. | सामान्य जनतेची व शासनाची बेपर्वाई. | शासन व सामान्य नागरीक. |
| पान-तंबाखूच्या पिचकाऱ्या, रस्त्यांवर टाकला जाणारा कचरा, घाण, थुंक्या, इत्यादी. | नागरिकांच्या घाणेरड्या सवयी. | सर्वसामान्य नागरीक, शहर शासन, सेवाभावी संस्थांकडून लोकशिक्षण. |

| | | |
|---|---|---|
| रस्त्यांवरील भिकारी, बेवारशी मुले, इत्यादी. | बाहेरून येणारे लोकांचे लोंढे, दारिद्र्य, काम करण्याच्या इच्छेचा अभाव. | राज्य व शहर शासन, सेवाभावी संस्थांकडून होणारे लोकशिक्षण. |
| रस्ते अडवून ठेवणारी बेवारशी गुरे, कुत्रे, इत्यादी. | सर्वसामान्य नागरिक व शहर शासन. | शहर शासन. |
| ध्वनी, वायू व इतर प्रकारचे प्रदूषण | औद्योगिक वाढ, वाहने, सार्वजनिक सण-समारंभ | राज्य व शहर शासन, सामान्य नागरिक, सार्वजनिक उत्सव मंडळे, धर्मस्थानावरील कर्णे. |
| जकात नाक्यावरील वाहतुकीची कोंडी. | अरुंद रस्त, अपुरे वाहनतळ, रस्त्यांवरील अतिक्रमणे. | राज्य व शहर शासन. |
| इतर बरेच काही. | सार्वजनिक हित व स्वच्छता या वृत्तीचा अभाव. | राज्य, शहर शासन, नागरिक व समाजातील प्रत्येक घटक. |



नेमेची उखडला जाणारा घोडबंदर रस्ता (प्रातिनिधिक)



पावसाळ्यात रस्तोरस्ती साठत राहणारे पाणी



चक्क नाल्यांमध्ये उभारल्या जाणाऱ्या झोपड्या!

खरं म्हणजे महानगरांची आजची अशी दुर्दशा होण्याला सगळ्यांत जास्त कुठला घटक कारणीभूत असेल तर तो महानगरपालिका! साहजिकच ह्या समस्येवर उपाय करून परिस्थिती सुधारण्याची सर्वाधिक जबाबदारीदेखील शहर शासनाचीच ठरते. त्यासाठीचे अधिकारदेखील त्यांच्याकडेच आहे. दुर्गंधीयुक्त रस्त्यांवरून जाताना तोंडात थुंकी येऊन ती बाहेर टाकावीशी वाटणे, ही नैसर्गिक प्रतिक्रिया होय. अशा वेळी थुंकणाऱ्याला दंड



शालेय विद्यार्थ्यांचे निसर्ग आणि पर्यावरण याविषयक प्रबोधन करताना लेखक श्री. पुनम सिंगवी

करण्याआधी रस्त्यांवर घाण साचून राहणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळेच नागरिकांकडून स्वच्छतेची अपेक्षा ठेवत असतानाच पालिकांनी त्यासंबंधीची आपली जबाबदारी प्रामाणिकपणे आणि कसोशीने पार पाडणे आवश्यक आहे, असे आपल्याला वाटत नाही का?

त्यासाठी नागरिकांनी स्वतः स्वच्छतेचे नियम पाळीत असतानाच आपण निवडून देत असलेल्या प्रतिनिधींनादेखील या दृष्टिकोणातून तोलून-पडताळून पाहणे आवश्यक आहे. भ्रष्ट रस्ते व सार्वजनिक ठिकाणे यांवर अतिक्रमण करणाऱ्या, पानतंबाखू खाऊन पचापच थुंकणाऱ्या उमेदवारांच्या झोळीत आपल्या मतपत्रिकेचा चोळामोळा होणार नाही, याची काळजी आपल्यापैकी प्रत्येकाने घेतली तर मुंबई स्वच्छ होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

मुंबई तरुण भारत, २५ एप्रिल १९९७

* * *

# १४. ... तर या देशात अनेक चंद्रशेखर निर्माण होतील

ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त टी. चंद्रशेखर यांच्या बदलीची बातमी पसरताच ठाण्यातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये संतापाची एकच लाट उसळली. सभा आणि आंदोलने यांची चर्चा सुरू झाली. निषेधाचे फलक लागले. ती नागरिकांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. त्यासाठी कुणाही राजकीय नेत्याला हाक द्यावी लागली नाही. आयुक्त म्हणून नेमणूक झाल्यानंतर चंद्रशेखर यांनी शहराची ठेवण, त्याचे प्रश्न, नागरिकांच्या समस्या; यांची व्यवस्थित माहिती करून घेतली. या शहरात राहण्याचा अधिकार अति श्रीमंत नागरिकांबरोबरच सर्वसामान्य माणसालाही आहे, याचे भान त्यांनी ठेवले, म्हणून तसे घडले. सर्वसामान्य ठाणेकरास रस्त्याने धड चालता येत नव्हते. मुक्त श्वास घ्यायला मिळत नव्हता, प्रत्येक श्वासाबरोबर त्याला धूळ, डिझेल-पेट्रोल आणि प्रदूषण निर्माण करणारे अन्य घटक आपल्या रक्तात सामावून घ्यावे लागत होते. दाद मागण्यासाठी जागा नव्हती. आपण ज्यांना प्रतिनिधी म्हणून निवडून दिले, ते भ्रष्टाचारात बरबटलेले दिसू लागल्याने लोकांचा त्यांच्यावरचा विश्वासच उडू लागला होता.

चंद्रशेखर यांनी हे जाणले. किमान नागरी सुविधा पुरविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, याचे भान ठेवून जुने काय मोडायचे आणि नवे काय घडवायचे, याचा आराखडा तयार केला. दोन्ही प्रकारच्या कामांना एकाच वेळेस सुरुवात झाली. आपल्या हाताखालील प्रशासनाला त्यांनी शिस्त लावण्याचा प्रयत्न केला. कंत्राटदारांच्या समस्या जाणून घेतानाच त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली. निर्वाचित लोकप्रतिनिधींचा सन्मान ठेवतानाच आवश्यक तिथे त्यांच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस दाखवले. शहरातील सेवाभावी सामाजिक संस्थांना आवाहन करून त्यांचे सहकार्य घेतले. आयुक्तांची आपल्या कामावरील निष्ठा आणि धडाडी पाहून या सर्व मंडळींनी त्यांना योग्य ती साथ दिली आणि ठाण्यात चमत्कार घडू लागला.

ठाण्याचे स्वरूप रोजच्या रोज बदलू लागले, अतिक्रमणे दूर होऊ लागली, रस्ते रुंद होऊ लागले, रहदारी निर्वेध होऊ लागली, जुने जाऊन आवश्यक तिथे नवे येऊ लागले. ही नुसतीच पडझड नव्हती, तिथे काही चांगले निर्माण होत होते. सामान्य माणसाच्या मनाला आणि डोळ्यांना ते भावत होते. त्यांच्या मनात आयुक्तांविषयी, त्यांच्या कृतीविषयी विश्वास निर्माण होत होता. आय. ए. एस. होणाऱ्या कुणाही अधिकाऱ्याकडून खरे तर असे होणे अपेक्षित असतेच, परंतु आजकाल ते दुर्मीळ झाले आहे, म्हणूनच लोकांना चंद्रशेखर यांच्याबद्दल अप्रूप वाटले.

हे घडत असताना अनेकांचे हितसंबंध दुखावले गेले. त्यांत गोरगरीब होते, लबाड होते, कसलेही विधिनिषेध नसलेले होते आणि मत्तेच्या जोरावर सत्तेवर अंकुश ठेवणारे धनदांडगेही होते. अशा प्रकरणात नेहमी जे होते, तेच झाले. आयुक्तांची कारकिर्द पूर्ण व्हायच्या आतच नगरसेवकांनी त्यांच्या बदलीचा ठराव मंजूर केला आणि बदलीचे आवाज घुमायला लागले. आयुक्तांच्या भावना काय होत्या कुणास ठाऊक, पण सामान्य नागरिक चवताळून उठला. सभा, आंदोलने, निषेध, लेख, व्याख्याने या सर्व मार्गांचा अवलंब करून, ठाण्यातील सामान्य नागरिकांनी आयुक्तांच्या बदलीचा ठराव मागे घेण्यास नगरपालिकेला भाग पाडले. आयुक्त बदलीवर न जाता पुन्हा कामला लागले. त्यांच्या कामाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला. परिणामी एके काळी शेजारच्या गलिच्छ शहरांच्या रांगेत असणारे ठाणे शहर त्यांच्यापासून वेगळे पडू लागले आणि भारतातील सर्वाधिक स्वच्छ आणि सुंदर शहराचा पुरस्कार प्राप्त करून बसले.

या सर्व धावपळीत ठाणे रेल्वे स्थानकाबाहेरील परिसर अतिक्रमणापासून मुक्त व्हायचा बाकी होता. कारण हे प्रकरण न्यायालयापुढे होते. न्यायालयाचा मनाई आदेश उठताच हा परिसर एका रात्रीत अतिक्रमणापासून मुक्त केला गेला. आणि नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला. आता स्थानकात जातायेताना धक्काबुक्की होणार नाही, चेंगराचेंगरीला तोंड द्यावे लागणार नाही; याचाच त्यांना आनंद होत होता. पण दुसऱ्याच दिवशी राज्य सरकारने आयुक्तांच्या बदलीचा हुकूम तडकाफडकी काढला. सरकारच ते आणि त्यांचा अधिकारच तो! मग त्याने तो तसा बजावला, तर बिघडले कुठे? आयुक्तांची मुदत संपली होतीच ना! पण मुदत संपली असली आणि

सरकारला बदलीचा अधिकार असला, तरी तो अधिकार कशा पद्धतीने, कुणासाठी वापरायचा; याचेदेखील भान ठेवायचे असते. या प्रकरणात सरकारने ते ठेवले नाही, हे सूर्यप्रकाशइतके स्वच्छ आहे.

आयुक्तांच्या बदलीच्या विरोधात संतापाची भावना उसळणे स्वाभाविक होते. लोकांनी एकेकट्याने वा सामूहिकपणे वैधानिक मार्गाने निषेध नोंदवलादेखील. परंतु ठाणे शहरात आयुक्त म्हणून चंद्रशेखर आले, तेव्हा ते संपूर्ण कारकिर्दीसाठी तर आले नव्हते ना! ज्या कालावधीसाठी त्यांची नियुक्ती झाली होती, तो कालावधी संपला होता ना. मग त्यांच्यावर फक्त ठाणे शहराचीच मालकी आहे, असे समजणे योग्य आहे का? देशातील इतर शहरांना त्यांची आवश्यकता नाही, असे समजणे योग्य आहे का? आयुक्तांनी ठाणे शहराचा चेहरामोहरा बदलून नवनिर्माणाची नवी दिशा दाखवून दिली आहे. ती वाट प्रशस्त करण्याची काही जबाबदारी नागरिकांचीदेखील आहे की नाही? गुंडांना सामोरे जायचे, जीवघेण्या धमक्यांना तोंड द्यायचे, सार्वजनिक हितासाठी ज्यांचे व्यक्तिगत नुकसान होते, त्यांचे शिव्याशाप खात राहायचे, हे काय फक्त आयुक्तांचेच काम आहे? आपला परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची जबाबदारी आपली नाही का?

चंद्रशेखर यांच्या जागी आलेले नवीन आयुक्त सुशिक्षित आणि प्रशिक्षित आहेत. ते चंद्रशेखर यांच्यासारखे काम करणारच नाहीत, असा अविश्वास दाखवण्याचे कारण नाही. लोकशाही राज्य पद्धतीत नागरिकांचे कर्तव्य आणि त्यांचे अधिकार हे मतदानापुरते सीमित नसतात. समाजहिताचे रक्षण करू न शकणाऱ्या अधिकाऱ्यांना व लोकप्रतिनिधींना खडसावण्याचा धीटपणा त्यांना दाखवावा लागतो. चंद्रशेखर यांची बदली झाली म्हणून असे अगतिक होऊन कसे चालेल? नकारात्मक आंदोलनांचा मार्ग सोडून जेव्हा सकारात्मक चळवळीस आरंभ करू, तेव्हा या देशात एक नव्हे अनेक चंद्रशेखर निर्माण होतील आणि मग या देशातील प्रत्येक शहर ठाण्यासारखेच सुंदर होईल.

लोकसत्ता, २९ मे २०००

* * *




असे असावेत रस्ते




असे नसावेत रस्ते


# ठाण्यातील नष्ट होत राहणारी कांदळवने










आहे ठाणे माझे सुंदर,
तरीही.... !













पुनम सिंगवी यांची ई साहित्यवर उपलब्ध पुस्तके

कव्हरवर एकदाच क्लिक/टॅप करा. एक मिनिट थांबा.

पुस्तक उघडेल



**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**पुनम सिंगवी यांचे हे सातवे पुस्तक.**

पुनम सिंगवी व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट, पेशाने प्राध्यापक, छंद पर्यावरणाचा, ध्यास समाजकार्याचा आणि पिंड म्हणाल तर लेखकाचा. आपणासि जे जे ठावे, ते ते लोकांस सांगावे हा त्यांचा वसा. त्यामुळे उत्तम वेव्हारे धन जोडोनी त्यांनी ते समाजकार्यासाठी उधळले. त्यांनी उभारलेल्या उत्तमोत्तम संस्था याची साक्ष आहेत. आणि त्यांच्या पुस्तकांतून हाच संदेशही मिळेल. समर्थांचा संदेश आयुष्यभर जगलेली आणि ती मूल्ये आजही सतत जपणारी व्यक्ती पहायची तर पंचाहत्तरी ओलांडलेल्या उत्साही पुनम सिंगवी यांना पहा.

पुनम सिंगवी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(२ पुस्तके), शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (८ पुस्तके), अविनाश नगरकर (४ पुस्तके), डॉ. स्मिता दामले (७ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२६ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत पावसकर(४),

मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक३), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(४), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(५), आनंद देशपांडे(२), नीलिमा कुलकर्णी, अनामिका बोरकर  असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।